कोणतीहि बातमी
कितीहि वाईट
असली तरी त्यांच्या
चित्ताची चलबिचल
व्हायची नाही.
कोणत्याही दुःखात
ते गीतेत म्हटल्या
सारखे अनुद्विग्नमना
असायचे.
वैताग दाखवणं तर
त्यांच्या स्वभावातच
नव्हतं.
पण ह्या बातमीनं
मात्र ते
ज्वालामुखीसारखे
भडकून उठले.

मी
नेताजींना
बघितलंय.



# माणूस

शनिवार
२ सप्टेंबर १९७२
किंमत ५० पैसे

माणूस
शनिवार
२ सप्टेंबर १९७२
पन्नास पैसे

वर्ष : बारा
अंक : चौदा

वार्षिक वर्गणी
पंचवीस रुपये

परदेशची वर्गणी
पासष्ट रुपये

संपादक
श्री. ग. माजगावकर

साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

साप्ताहिक माणूस
१०२५ सदाशिव
पुणे ३०.

दूरध्वनी : ५७३५९

# माणूस

## सप्रेम नमस्कार....

□ 'माणूस'चा स्वातंत्र्य-दिन विशेषांक वाचला. 'अप्रतिम' हा एकच शब्द विशेषण म्हणून मी वापरतो. एका दमात वाचून काढला तेव्हा एखादा चांगला पदार्थ भरपूर न मिळाल्याने जशी अवस्था होते तशी झाली. फक्त एकच गोष्ट खटकली ती आपल्या निदर्शनास आणावी अशी इच्छा आहे.

प्रिय नेताजींनी जपानच्या मदतीने ब्रह्मदेशमार्गे भारत-प्रवेश करण्यासाठी आझाद-हिंद फौज निर्माण केली आणि इंग्रजांबरोबर युद्ध पुकारले १९४५ मध्ये. आणि मे. थोरात इंग्रजांना विजय मिळवून देण्यासाठी जपान-बरोबर आराकानमध्ये लढले ते १९४५ मध्ये. मे. थोरात आणि त्यांचे भारतीय पंजाबी सहकारी यांनी लढाईत पराक्रम केला पण तो केवळ पोटासाठी. देशप्रेम नावाची चीज त्यामध्ये होती काय ? आझाद हिंद सेनेतील सैनिक लढले ते केवळ देशासाठी. इंग्रजी फौजेतील भारतीय सैन्य आणि आझाद-हिंद फौजेतील भारतीय सैन्य यांच्या पराक्रमाची तुलना कधी होऊ शकेल काय ? स्वातंत्र्यदिन विशेषांकामध्ये 'बॅटल ऑफ् आराकान' हा लेख छापून तुम्ही काय साधलेत ?

**मधुकर सरनाईक** (कुडाळ)
२०–८–७२

[ पंचवीस वर्षांपूर्वीच्या वस्तुस्थितीकडे आपण आता सर्वांगांनी पाहण्याचा प्रयत्न केला पाहिजे—सं. ]

□ माणूस १५ ऑगस्ट विशे-षांक वाचला. अंक आवडला. मध्यान्ह हा अग्रलेख तसेच सामान्यजन व रुखवताची

कहाणी या लेखातून सामान्य माणसाची व्यथा वेशीवर टांगली गेली आहे. पण या आक्रंदनाचा काय उपयोग? गेली २५ वर्षे हे आक्रंदन चालूच आहे. आणखी किती काळ चालू राहणार आहे हे कोणी सांगू शकेल काय?

आणि मध्यमवर्ग. त्याला काही व्यथा आहेत, असू शकतात हे कोणाला खरच वाटत नाही. शिक्षण, वाचन आणि संस्कारामुळे विकसित झालेल्या बुद्धीला स्पष्ट-पणे जाणवणारी कुचंबणा आणि त्यामुळे निर्माण झालेला असह्य मानसिक ताण हे सारे सहन करीत आजचा मध्यमवर्ग पराभूत मनःस्थितीत दिवस कंठतो आहे.

'मंगलधाम' आणि 'भूमिगत आठवणीं'तून आज ज्या स्वातंत्र्याचा रौप्य-महोत्सव साजरा होत आहे, ते स्वातंत्र्य मिळविण्याकरता पारतंत्र्यातील पिढ्यांनी केलेले श्रम, स्वार्थ-त्याग आणि बलिदान यांचे अंशतः दर्शन घडते. अनेक कुटुंबे देशोधडीला लागली. अनेक अज्ञात, नाही चिरा नाही पणती या अवस्थेत जगले आणि मेले. आणि आजच्या पिढीला हे स्वातंत्र्य रक्ताचा एक थेंब सांडल्याशिवाय मिळवले अशा वल्गना ऐकविल्या जातात.

आणि म्हणूनच 'मी नेताजींना बघितलंय्' ही लेखमाला योग्य वेळी चालू केल्याबद्दल अभिनंदन. रक्ताच्या एका थेंबाशिवाय मिळालेले स्वातंत्र्य हा गजर ऐकून स्वातंत्र्यानंतर जन्मास आलेल्या पिढीला वाटत असेल की नुसत्या सभा आणि मिरवणुका काढून स्वातंत्र्य मिळू शकते. फार फार तर चार दोन बसगाड्या जाळल्या की झालं. तेव्हा नेताजींसारख्या स्वातंत्र्ययोद्ध्यांची आठवण जागृत ठेवण्याचे काम कोणीतरी करणं आवश्यक आहे. हा विषयच असा आहे, की त्यावर शेकडो ग्रंथ व्हावेत. अनेक, असंख्य भाष्यं व्हावीत. पण...!

श्री. अशोक शहाणे यांनी अनुवादित केलेल्या श्री. नारायण सान्याल यांच्या मूळ लेखाचे नाव काय? तो पुस्तकरूपात प्रसिद्ध आहे का?

पहिल्या जबानीच्या साक्षीदार श्रीमती आरती नायर ही व्यक्तिरेखा वास्तव आहे का? असल्यास त्या हयात आहेत काय? खरोखरच का त्यांनी भारत पाहिलेला नाही? ज्यांनी एका ध्येयानं प्रेरित होऊन आपले सर्वस्व पणाला लावलं. स्वतःचं जीवन कवडीमोल मानले त्यांच्या त्यागाची अंशतः देखील परतफेड या रौप्यमहोत्सव प्रसंगी होऊ नये का? उणीपुरी दोन वर्षे एकच ध्यास मनी बाळगला. एकच स्वप्न रात्रंदिवस पाहिलं. भारतभू स्वतंत्र करणं, स्वतंत्र झालेली पाहणं या एकाच विचाराने झपाटलेली ती जीवनं. या भारतवर्षाची भूमी, जी त्यांनी कल्पनेनं अनेक वेळा पाहिली असेल, याची देही याची डोळा त्यांना तिचं दर्शन घडू नये, एवढं का त्यांचं दुर्भाग्य असेल?

१४ ऑगस्ट, १९७२ — ल. रा. सावबा, मुंबई

[मूळ बंगाली पुस्तकाच्या आवृत्त्यांवर आवृत्त्या निघत आहेत. इतर खुलासा लेखमालेतून क्रमाक्रमाने होत राहीलच. —सं.]

# मुक्काम पुणे

# साहित्यसम्राटाला मानवंदना !

मुकुंद मणूरकर

२४ ऑगस्ट १९७२ हा नरसिंह चिंतामणी उर्फ तात्यासाहेब केळकर यांच्या जन्मशताब्दीचा दिवस ! साहित्य, राजकारण, समाजकारण यात सारख्याच तोलाने चांदणे शिंपीत जाणाऱ्या या महापुरुषाला वंदन करण्यासाठी बालगंधर्व रंगमंदिरात एक मोठा समारंभ झाला. अध्यक्षस्थानी होते केंद्रीय अर्थमंत्री नामदार यशवंतराव चव्हाण.

बरोबर ४ वाजता, म्हणजे ठरलेल्या वेळी पडदा उघडला व मुख्य पाहुण्यांचे सजविलेल्या रंगमंचावर स्वागत झाले. हिराबाई बडोदेकर आणि सरस्वतीबाई राणे यांच्या सुरेल आवाजात 'महाराष्ट्र गीत' सुरू झाले आणि पुढचा आकर्षक...... छे, छे, पुढच्या कार्यक्रमाला आकर्षक म्हणताना लेखणी अडखळतेय !

याप्रसंगी, रंगमंदिराने पाहिलेले पूर्वीचे दोन मुक्त कार्यक्रम उगीचच आठवतात. पैकी एक होता रंगमंदिराच्या उद्‌घाटनाचा ! यशवंतरावांच्याच उपस्थितीत पु. ल. देशपांड्यांनी तो कौशल्याने हाताळला होता. तसाच दुसरा प्रसंग म्हणजे आचार्य अत्र्यांचा ना. सी. फडक्यांच्या हस्ते झालेला सत्कार ! वक्तृत्वाची जुगलबंदी त्या वेळी पहायला मिळाली. या मालिकेतच हाही कार्यक्रम बसेल असे वाटले होते. (निदान तशी हवा तरी निर्माण केली गेली होती !)

पण उण्यापुऱ्या दिडएक तासाचाच हा कार्यक्रम झाला आणि त्यात भाषणापेक्षा इतर कार्यक्रमांचीच रेलचेल होती. ही जंत्री पहा :- महाराष्ट्र गीत, केळकर-टिळक यांच्या पुतळ्यांना पुष्पहार अर्पण, कार्यक्रमाची रूपरेषा, संदेशवाचन, केसरी प्रकाशनाच्या 'केळकर ग्रंथा'ची कल्पना, त्यातील साहित्याची ओळख, ग्रंथाचे प्रकाशन, १०-१५ लेखकांचा सत्कार, अध्यक्षांना व इतर मान्यवरांना पुष्पहार, आभारप्रदर्शन व वंदेमातरम् ! यातून उरलेल्या वेळात चार-पाच वक्त्यांची भाषणे. घाईगर्दीने झालेली. त्यातल्या त्यात यशवंतरावांचेच भाषण जरा मोकळेपणाने झाले.

पुण्याचे महापौर निळूभाऊ लिमये म्हणाले, '१९१८ साली पालिकेचे पहिले लोकनियुक्त नगराध्यक्ष म्हणून केळकरांची निवड झाली. २०–२२ वर्षे ते पालिकेचे सभासद होते. पालिकेत त्यांचा जबरदस्त वट होता. ते सांगतील तशा नियुक्त्या, सांगतील तसा कारभार होत असे.'

डॉ. रा. शं. वाळिंबे म्हणाले, 'मानवी जीवनातील दोन टोकात समन्वय साधण्याचा केळकरांनी प्रयत्न केला. त्यांनी ज्या तारतम्याचा विचार करून राजकारण केले त्याप्रमाणे साहित्यातही तारतम्य बाळगले. अभिरुचीसंपन्न समाज करण्यासाठी जे अभद्र, अश्लील, अमंगल ते त्याज्य केले पाहिजे या आग्रहाला बळी पडून तात्यासाहेबांनी काळजीपूर्वक लिखाण केले. अनेक संस्थांशी त्यांचा जवळकीचा संबंध होता. पुणे विद्यापीठाच्या स्थापनेत त्यांनी मोलाचे कार्य केले.'

जयंतराव टिळकांनी केळकरांची बैठक भक्तियुक्त, भावनाप्रधान, न्यायबुद्धीची होती असे सांगितले. केळकरांच्या लेखणीचे वर्णन करताना ते म्हणाले, 'तरुणीच्या पदस्पर्शाने कोणताही वृक्ष फुलतो असे म्हणतात, त्याप्रमाणे केळकरांनी लेखणी चालविली की कुठलाही विषय बहरून येई. वाढलेल्या शेतात वारुळे असतात, विद्वत्तेच्या दंभाचे नागाचे फणे फडफडतात, केळकरांनी प्रसंगी तेही ठेचले; पण प्रत्येक गोष्ट तोलूनमोलून केली. तात्यासाहेब न्यायप्रिय होते, पण पत्रकारित्व म्हणजे केवळ न्यायाधिशत्व नव्हे तर वकिलीही आहे हे त्यांनी जाणले होते.

या प्रसंगी पु. भा. भावे यांना 'महाराणी' या नाटकाबद्दल १००० रु. चे रोख पारितोषिक दिले गेले. भाव्यांचे छोटेसे भाषणही झाले. विषय कुठलाही असो, भावे मोठ्या भावविवशतेने बोलतात व एक विशिष्ट दिशा गाठण्याचा प्रयत्न करतात. ते म्हणाले, 'केळकरांच्या दोनच गोष्टी स्मरणात राहिल्या. एक त्यांची पादत्राणे. ते ती सारखे बदलीत असत आणि दुसरे म्हणजे, नौखालीच्या अत्याचारानंतर 'अहो, बायकापोरे मारली गेली त्याचे फार फार वाईट वाटते' हे त्यांचे उद्‌गार! का कुणास ठाऊक पण या दोन गोष्टी विसरल्या जात नाहीत!' केळकरांच्या व्यक्तिमत्त्वाबद्दल बोलताना ते म्हणाले, 'तेजःपुंज चेहऱ्याचे तात्यासाहेब उपस्थित झाल्यावर जागा भरते, प्रफुल्लित होते, सुगंधित होते!'

यानंतर प्रभाकर पाध्यांचेही भाषण झाले. केसरी प्रकाशनाच्या 'केळकर ग्रंथा'ची अनुक्रमिका त्यांनी वाचून दाखविली!

ना. यशवंतरावांचे भाषण मात्र विस्तृत व प्रसंगाला साजेसे झाले. ते मुख्यतः केळकरांच्या राजकारणावर बोलले. सुरुवातीलाच त्यांनी सांगून टाकले, 'तात्यासाहेब केळकरांच्या विचाराशी जी पिढी त्वेषाने लढली, त्या पिढीतला मी एक प्रतिनिधी आहे. पण आता तो त्वेष राहिला नाही. या समारंभाचे निमंत्रण स्वीकारल्यानंतर मी केळकरांचे साहित्य परत काळजीपूर्वक वाचले आणि माझ्या शंका दूर झाल्या. त्यांनी प्रदिपादलेली मते अचूक होती. गांधींच्या असहकाराच्या




गतस्मृती !

चळवळीबद्दल त्यांनी लिहिले होते, की हा मार्ग बिकट असला तरी अंती स्वातंत्र्यप्रत हटकून पोचविणारा आहे.' केळकरांचे लेखन प्रांजल, प्रामाणिक होते. केळकर टिळकांचे विश्वासू सहकारी होते. पण स्वतंत्र वृत्तीचे होते. इंद्रधनुष्याचा एक रंग संपून दुसरा कुठे सुरू होतो हे कळत नाही, त्याप्रमाणे टिळकांचे राजकीय अनुयायित्व संपून केळकरांचे वैचारिक नेतृत्व कुठे सुरू होते हे कळत नाही!' एकूण यशवंतरावांचा सूर चांगला लागला होता, पण कार्यक्रम लवकर आवरावयाचा असल्याने इतर वक्त्यांकडून नीट साद मिळाली नाही.

रँ. महाजनी, अप्पासाहेब पवार, न्या. नाईक, डॉ. कोलते ही कुलगुरू मंडळी शोभेच्या खुर्च्यांवर नुसती उपस्थित होती.

असा हा घाईगर्दीत उरकलेला कार्यक्रम! याला शोभा होती, पण सुगंध नव्हता,

भव्यता होती पण भावोत्कटता नव्हती. छायाचित्रकारांनी मारलेले प्रकाशझोत पाच पाच मिनिटांनी दिसत पण वक्त्यांच्या वक्तृत्वाच्या फुलबाज्या काही बघायला मिळाल्या नाहीत ! ¤

## आणि हा दुसरा कार्यक्रम

दुसऱ्या दिवशी भरत नाट्य मंदिरात ' केळकर : काल व कर्तृत्व ' या विषयाच्या अनुषंगाने रा. शं. वाळिंबे, प्रा. राम बापट, ग. ल. ठोकळ व ग. त्र्यं. माडखोलकर यांची भाषणे आयोजित केली होती. केळकरांच्या एकेका पैलूचे एकेकाने विवरण केले.

' केळकरांचे व्यक्तिमत्व ' या विषयावर बोलताना ग. ल. ठोकळांनी नवीन लेखकांना प्रोत्साहन देणे, त्यांचे कौतुक करणे हा केळकरांचा विशेषगुण असल्याचे सांगितले. ' वेळात वेळ काढून ते पुस्तकांना अभिप्राय देत असत. प्रस्तावना देण्याचा तर त्यांच्याकडे मक्ता होता, त्याचप्रमाणे अध्यक्षपद ही त्यांची मिरासदारी होती. अध्यक्षीय खुर्चीला त्यांच्यामुळे शोभा येई. '

प्रा. राम बापट ' केळकरांचे राजकारण यावर बोलले. केळकरांच्या ' मध्यम-क्रमा 'ची त्यांनी आपल्या भाषणात भलावण केली. न्या. रानडे व केळकर यांच्यात कसे साधर्म्य होते हे त्यांनी निरनिराळी उदाहरणे दाखवून सिद्ध केले. त्यांनी एक नवा मुद्दा मांडला. रानडे व केळकर हे प्रेषित नव्हते. त्यांनी स्वतःच्या इच्छेने कार्य केले. (' रानडे हे प्रेषित नव्हते ' हे म्हणणे माडखोलकरांनी नंतर खोडून काढले.) संसारी, सावध गृहस्थाच्या राजकारणाची भूमिका केळकरांनी घेतली. केळकरांचा ' मध्यमक्रम ' श्रेयस्कर कसा हे सांगताना प्रा. बापट म्हणाले, ' सर्वसामान्य माणसांना झंझावती व्यक्तिमत्वाचे, भव्य-दिव्य कृतींचे आकर्षण असते. पण ते वादळ शमले, स्थिरस्थावर झाले की, लोकांना केळकरांच्या मध्यममार्गाकडेच वळावे लागते. जोपर्यंत भारतात संसदीय लोकशाही जिवंत आहे, तिचे ऐतिहासिक कार्य जोपर्यंत शिल्लक आहे तोपर्यंत केळकरांच्या मध्यम क्रमाचाच ध्यास सर्वसामान्य माणूस होईल. (हेही म्हणणे माडखोलकरांनी खोडून काढले. )

' केळकरांचे समाजकारण ' यावर बोलताना डॉ. रा. शं. वाळिंबे म्हणाले, ' केळकरांनी सामाजिक लेखन अगदी अल्प केले. आधी राजकीय सुधारणा असे त्यांचे मत होते. सुधारणेच्या बाबतीत त्यांचा आदर्श टिळक नसून रानडे होते. हर्बर्ट स्पेन्सरच्या ' सत्य भिन्न भिन्न ठिकाणी असते ' या विचाराने प्रभावित होऊन त्यांनी मध्यमक्रम अनुसरला. सुधारणा पाहिजेत पण त्या ' योग्य ' सुधारणा हव्यात असे त्यांचे मत होते. समाजाला चुचकारून, त्याची समजूत घालून पुढे जाणारा

हा खरा सुधारक, समाजाला धक्के देणारा, त्यांच्या चुका दाखविणारा हा सुधारक नव्हे. शिवाय सुधारणा ही बहुमताने मान्य झाली पाहिजे, व्यक्तिस्वातंत्र्याची कल्पना चूक आहे, असे केळकरांचे म्हणणे होते."

नंतर ग. त्र्यं. माडखोलकर उठले ते वाद करण्यासाठी ! 'आधीच्या वक्त्यांनी मध्यमक्रमाचा उलगडा करण्यास ८५ मिनिटे घेतली, मग मी आता १५ मिनिटात ते कसे करणार ? म्हणून मी विषयांतर करतो' असे म्हणून त्यांनी राम बापटांच्या 'रानडे हे मध्यममार्गी होते, प्रेषित नव्हते' या मुद्यावर हल्ला चढविला. ते म्हणाले, 'रानडे हे मध्यममार्गी कधीच नव्हते. ते प्रेषित होते, द्रष्टे होते. असे जर ते नसते तर 'जगाची नियती आज ब्रिटन, फ्रान्स, अमेरिका, रशिया व पूर्वेकडील उगवती शक्ती यांच्याच हातात आहे' हा विचार त्यांना १८७९ मध्ये सुचला नसता. नंतर त्यांनी बापटांच्या 'मध्यममार्गी शिकवणच राष्ट्राला उपयोगी ठरते' यावर हल्ला चढविला. ते म्हणाले राष्ट्राच्या उत्कर्षासाठी काहीतरी खळबळजनकच हवे. महापूराच्या झंझावातात काही उत्पातही होत असतात तशाच काही उत्पत्तीही होत असतात. १८९५ साली लोकमान्यांनी स्वराज्यपक्षाची स्थापना केली नसती १९२० साली गांधीजींनी असहकारितेचा मार्ग दाखविला नसता किंवा १९६९ मध्ये इंदिरा गांधींनी काँग्रेस ताब्यात घेतली नसती तर राष्ट्राला नवा मनू दिसला नसता. इतके बोलल्यावर आपण अनुचित भाषण करीत आहोत हे त्यांच्या लक्षात आले. विषय केळकरांचा, भाषण रानड्यांवर ! नंतर दोन मिनिटे ते केळकरांवर बोलले. 'साहित्य सम्राट' या बिरुदाबद्दल बोलले. ते म्हणाले, 'चिपळूणकरांनंतर सुंदर, सौष्ठवपूर्ण भाषा लिहणारा केळकरांशिवाय दुसरा झाला नाही. वाक्य वाचल्यानंतर वाचक उल्हसित झाला पाहिजे, आनंदित झाला पाहिजे, शिवाय त्याने स्वत: काहीतरी विचार केला पाहिजे, या भावनेने केळकर लिहीत. त्यामुळे त्यांच्या भाषेत रूचिरता व उद्‌बोधकता हे दोन गुण दिसतात, यामुळेच सभोवताली ज्येष्ठ, कनिष्ठ साहित्यक असतानाही केळकर त्यांच्यापेक्षा श्रेष्ठ ठरले !'

केळकरांच्यावर अधिकारवाणीने बोलू शकणाऱ्यात माडखोलकरांचा क्रम बराच वरचा लागेल. त्यांनी पहिला वादविवाद केला नसता तर बरंच काही चांगलं ऐकायला मिळालं असतं !

# मुंबई वार्ता

## पूर्वाश्रमींचे कॉम्रेड्स फारच बदनाम झाले !

**प्रतिनिधी**

संप संपला एकदाचा. काल सकाळच्या वर्तमानपत्रांनी ही बातमी दिली आणि मुंबईकरांना हायसे वाटले. त्यांनी सुटकेचा निश्वास टाकला. संपकाळात मुंबई-करांचे फार हाल झाले खरे, पण त्यांनी आल्या परिस्थितीशी असे काही जुळवून घेतले होते की काही विचारू नका. रस्त्यारस्त्यावर साठलेले ते कचऱ्यांचे ढीग दुर्गंधी पसरवत होते. चालत जाणे हा तर रोजचाच उद्योग होऊन बसला होता टॅक्सी कशी परवडणार रोज ? अनेक बाबतीत कुचंबणा होऊनही शांत मुंबईकर फक्त थोडाफार कुरबुरला. बाकी सबकुछ ठिक था !

काल संप संपला आणि मरगळलेली मुंबई पुन्हा टवटवीतपणा धारण करू लागली. सफाई कामगार क्षणाचीही फुरसद न घेता कचऱ्याचे ढिगारे उपसत होते. त्यांची तशी कीव येत होती बुवा. अहो साचलेल्या कचऱ्यामुळे येणारी दुर्गंधी आपण सहन करू शकत नाही हे बिचारे कामगार त्यातच सडून मरतात. त्यांची दखल कोण घेणार ? तसे अनेक 'जागरूक' नागरिक रस्ते साफ करीत होते पण आपल्या दारातील घाण दुसऱ्याच्या दारात टाकण्याइतकीच ती साफसफाई होती. शिवसेनेची एक मजा सांगतो. परवा म्हणजे रविवारी संध्याकाळी गिरगावातील विठ्ठलभाई पटेल रोडवर एक शिवसैनिक आवेशात शिवसेनेचा भगवा ध्वज हाती घेऊन मोठ्या दिमाखाने चालला होता. त्याचा डौल कौतुकास्पद होता यात शंकाच नाही. लोकही क्षण दोन क्षण थांबून डोळ्याचे पारणे फेडत होते. त्याच्या मागो-माग दोन शिवसैनिक कचऱ्याची एक छोटी गाडी ढकलीत होते. फारसा काही कचराही नव्हता त्यात. पण शिवसेनेची जाहिरात करण्याचा त्यांचा उपक्रम फर्मास होता. मला वाटते यापासून सफाई कामगारांनीही बोध घ्यावा. साफसफाई करताना त्यांनी आपला स्वतःचा एखादा ध्वज असाच फडफडत न्यायला हरकत

पृष्ठ ५८ वर

# दारुबंदी उठते आणि....

**एमेम**

'क्या हूँ साब ?'

'दो ग्लास व्हिस्की !'

'व्हिस्की ?'

'हां, आजसे खुली हुई है ना ?

'तो वडारवाडीमें जाओ. और एक ध्यानमें रखो. मेरे साथ मस्करी मत करना. हां'

'कायकू गरम होता रे. छोडो. दो ग्लास पानी और एक चाय लाओ.' □ □

'खरं म्हणजे हा आपल्या पूज्य बापूजींच्या तत्त्वांचा अपमान आहे.'

'नाही हो ! बदलत्या परिस्थितीत मतंही बदलली पाहिजेत !'

'कसली बदलती परिस्थिती ? दारू पिऊन पूर्वीही लोकांचे नुकसान व्हायच तसच आताही होणारच !'

'खर सांगू, या नुकसानीविकसानीसाठी बापूजींचा दारूला विरोध नव्हता. दारू प्यायली की लोक प्रश्न, अडचणी थोडा वेळ विसरतात. मग स्वराज्यासाठी चळवळ कोणी केली असती ? स्वराज्याच्या प्रश्नाकडे लोकांचे नीट ध्यान रहावे म्हणून बापूजींनी दारुबंदीचा पुरस्कार केला, आणि लोकांना नीटं पटावे म्हणून भीषण परिस्थितीचे चित्र पुढे केले. आता स्वराज्याचा प्रश्न उरला नाही. तेव्हा प्यायला काही हरकत नाही. शिवाय सरकारला दरसाल कोटयावधी रुपये मिळणार !'

'असं होय ! मी आपला समजत होतो दारूला बापूजींचा मनापासून विरोध आहे. चला, आजपासून लपूनछपून प्यायला नको !' □ □

'बाई, बाई, बाई, आता मात्र हद्द झाली हो ! इतके दिवस मेले नुसते अचकट

विचकट बोलायचेच, आता मात्र हेलपाटत अंगावर की हो येतील! रस्त्याने चालायची सोय म्हणून काही उरणार नाही आता.'

'हो ना, नसत्या एकेक काळज्या. त्या इंदिराबाईला म्हणावं, कर काही तरी.'

'पण त्या बाईची मात्र कमाल हो. इथं आमची घरात चार शब्द बोलताना फे फे उडते; आणि ही भुट्टो काय, निक्सन काय, सगळ्यांशी फाड फाड बोलते. आणि काम तरी किती करते नाही!'

'बरं झालं बाई, विचारायचं विचारायचं म्हणून म्हणतेय, आता इंदिरा गांधी-वरून आठवण झाली. ब्राह्मणात गांधी आडनाव असतं का हो? परवा आमच्या बेबीला एक स्थळ आलं होतं, चांगलं आहे, पण–' ◻ ◻

'साला वेटर उगीचच गरम झाला. आत्ता हा चहा आणि दारू यात काही फरक आहे का?'

'काही नाही.'

'काही नाही कसा, आहे. चहाने भूक मरते आणि दारूने भूक लागते.'

'बरं मग, म्हणायचंय काय?'

'म्हणायचं काही नाही, पण सालं इथं अन्न नाही! आज आपल्या भारतात–'

'पुरे, पुरे, माझ्याशी शाळा नको करू!' ◻ ◻

'काहो, ही रमची बाटली केवढ्याला?'

'पस्तीस रुपये.'

'द्या एक.'

'परमिट बघू.'

'अहो खुली झाली ना? बरं कुठे मिळतं परमिट?'

'कुठे मिळेल ते माहीत नाही, पण केव्हा मिळेल ते माहीतेय्.'

'केव्हा?'

'पुढच्या पंचवार्षिक योजनेत!'

'सालं गव्हर्मेंट काही सुखासुखी पिऊन देणार नाही.' ◻ ◻

'मंत्रीमहोदय, ही एकवीस वर्षांची मर्यादा मान्य आहे, पण हा परमिटचा अडसर कशाला ठेवलात हे सभागृहाला सांगण्याची मेहरबानी कराल काय?'

'अवश्य! मावळत्या सूर्याच्या साक्षीनं आम्ही समाजवादाचं कंकण बांधले आहे. आज महाराष्ट्रात प्रतिदिनी पाचशे बेकारांची नव्याने भर पडत आहे. परमिट व्यवस्थेमुळे त्यातील पाच-सात हजारांना काम मिळू शकेल असा अंदाज आहे. ज्या कुटुंबात एकही व्यक्ती मिळवती नसेल त्यांना प्राधान्य–' ◻ ◻

'काय अल्के, तू काढणार की नाही परमिट ?'

'हो, काढू की. काढायला तर काही पैसे पडत नाहीत, पण आधी एकदा टेस्ट घेतली पाहिजे.'

'मी दोन तीन वेळा घेतलीय, डिसूझा तर रोज घेते !'

-'कसं वाटतं ग घेतल्यावर ?'

'टॉप. तुला घ्यायचीय ? कमिंग संडेला प्रोग्रॅम आहे डिसूझाकडे. तेव्हा चल.'

◻ ◻

'पण याचा तुमच्या धंद्यावर परिणाम होईल की नाही ?'

खरं सांगू, छापणार नसाल तर सांगतो; कायबी परिणाम होणार नाय.'

'पण गव्हर्मेंट तुम्हांला म्हणे एक फॉर्म्युला करून देणार आहे. आणि त्या फॉर्म्युल्याप्रमाणे करायची म्हणजे–'

'कसला फॉमिला घेऊन बसलाय राव ! ती तसली कोन पील काय ? फॉमिल्याप्रमाणे करायच्या धा-वीस बाटल्या, तुमच्यासारख्यांच्याकरिता आणि ठेवायच्या त्या इथं मांडून. आतमंदी आपली पेशल भट्टी चालणारच !–घ्यायची का थोडी, पहिल्या धारेची हाय !'

'नको, नको, आज नको, पुन्हा येईन !'

◻ ◻

'च्यायला, पण आपल्याला परमिट नाही मिळणार !'

'न का मिळेना. प्यायला तर मिळेल.'

'ते कसं काय ?'

'शिस्तीत बारमध्ये जायचं आणि मागायची. तो म्हणाला परमिट दाखव तर म्हणायचं विसरलं. अगदीच आखडायला लागला तर सरळ तिथं पीत असणाऱ्याकडे जायचं आणि त्याच्या परमिटवर त्याला आणखी मागवायला सांगायची. पैसे आपण दिले म्हणजे झालं !'

'आयडिया !'

◻ ◻

'च्यायला, फक्त चहावरच सोडायचं काय तुला ? ते काही नाही. आता खुली झालीय, तेव्हा त्याचीच पार्टी होऊ दे !'

'ए, दारूच्या गोष्टी त्याच्याशी करू नकोस हं, बापूजींचा भक्त आहे तो !'

'च्यायला, बापूजींचं नाव कशाला काढलंस संध्याकाळच्या वेळी. ते आपले नंबर एकचे शत्रू आहेत.'


'का वरं ?'

'दारूला ज्यांचा ज्यांचा विरोध ते सर्व आपले शत्रू !'

◻ ◻

'बघा नानासाहेब, मी म्हटलं तसंच झालं की नाही ! ताडी विकायला काढली

**छोट्या नायकाला प्रेरणा देणारी साठे माल्टेक्स बिस्किटे**




पहिल्या पासूनच मी लढाऊ वृत्तीचा. लुटुपुटीची बंदूक घेऊन फिरण्याची व खेळण्याची भारी हौस. मध्येच भूक लागली तर खायला माल्टेक्स बिस्किटे! माल्टेक्स बिस्किटे माझी तब्येत ही अशी तुस्त राखतात. कारण त्यातील माल्ट व पौष्टिक घटक पूर्णपणे उत्साह वाढविणारी आहेत.




heros' SBC-9?A

तेव्हाच मी ओळखलं, की आज ना उद्या दारुबंदी उठणारच !'

'पण खापर मात्र इतरांवर फोडलं. म्हणे इतर राज्यात दारुबंदी नाही. तिथली दारू म्हणे इथं आयात होते.'

-'हे म्हणजे 'शेजारील बाई धंदा करते म्हणून मीही खिडकीत बसायला लागले असं म्हणण्यासारखं आहे. हँ, हँ हँ !'

'पण एकदा खुली झाल्यावर टेस्ट घेतली पाहिजे. बाकी सर्व केलं पण अजून थेंबाला नाही शिवलो. तेवढी इच्छा नको मागे रहायला !' ◻ ◻

'– दारुबंदीशी सुसंगतच हे धोरण आहे. दारू खुली करून आम्ही दारूबंदी धोरणाचा खुंटा हलवून घट्ट करणार आहोत. दारू प्यायल्यावर काय होतं हे कळल्यावर लोक आपोआपच दारूपासून दूर होतील.'

'पण मग हे आधी कसं सुचलं नाही ?'

'मा. सभासदांनी माझ्या भाषणात अडथळा आणू नये. – तर अंतिम विजय दारुबंदीच्या धोरणाचाच होणार आहे.' ◻ ◻

'पोपट बोलत नाही. त्याने मान टाकली आहे, पंख पसरून तो शांतपणे पडला आहे.'

'मग पोपट मेला असं का म्हणत नाही ?'

'छे, छे, त्याने निर्विकल्प समाधी लावली आहे !'

◻ ◻ ◻

---

## कुणास ठाऊक !

रवींद्र पिंगे सचिवालयात असतानाचा हा किस्सा ! त्यांच्या कचेरीत एक तरुण नव्याने नोकरीला लागला. त्याला दिवसभर खूप काम असे. टेबलावर कागदपत्रांचा मोठा ढीग पडलेला असे. एक दिवस त्याने धीर करून पिंग्यांना विचारले, 'काय हो, तुम्हा कुणाला काही विशेष काम नसतं आणि मला एकट्यालाच कसं एवढं काम दिलं ?'

पिंगे म्हणाले, मलाही खूप काम असतं. पण मी काय करतो माहीत आहे ? माझ्या टेबलावर कागद आला रे आला की मी त्यावर श्री. पाथरपेकर असं लिहून कागद ट्रे मध्ये टाकतो. एवढ्या मोठ्या ऑफिसात पाथरपेकर नावाचा कोणीतरी इसम असतोच. त्याच्याकडे बरोबर तो कागद जाऊन पडतो !'

'अहो मीच तो पाथरपेकर'–टेबलावरील ढिगाकडे दृष्टी टाकून तो तरुण म्हणाला. ◻

---

चार वर्षांनी श्वाझीचा
हा भारतीय शागीर्द मायदेशी परतला
आणि बेधडक म्हणू लागला,
‘ आय ब्रीद इंटरनॅशनल लॉ ’



# विश्वामित्राचा पुत्र

**लक्ष्मण लोंढे**

वर्ष १९५९. जून महिन्याचा सुमार. विल्सन कॉलेजचं पटांगण. दुपारचे ११–१२ वाजले आहेत. साऱ्या कॉलेजातल्या मुलांना एम्. ए. च्या विद्यार्थ्यांनी बाहेर काढलं आहे. एवढा सारा विद्यार्थ्यांचा जमाव बाहेर पटांगणात आहे. थोडासा गोंधळ चालू आहे। इतक्यात दोन-चार पोरं एक बाकडं बाहेर आणतात. आणि एका मुलाला त्यावर हात धरून उभा करतात. सांगतात, बोल वाडेगावकर, आता बोल काहीतरी. आणि तो बोलू लागतो. तासभर ठणकावून भाषण ठोकतो. विषय साऱ्या विद्यार्थ्यांच्या जिव्हाळ्याचा. त्यांचे एक प्राध्यापक डॉ. लवंदे यांना मुंबई विद्यापीठानं काही कारण नसतानां एकाएकी काढून टाकलेलं असतं. त्यातून हे प्रकरण पेटलेलं असतं. वाडेगावकर – एक विद्यार्थी नेता – मग रागारागानं विद्यापीठावर तोंडसुख घेतो. आणि कॉलेजच्या बाल्कनीतून प्रि. आयरन हे सारं हताशपणे पहात असतात. नंतर केव्हा एकदा ते वाडेगावकरला म्हणतात – ‘ वाडेगावकर, तुझ्या शब्दात आग आहे. तू समुद्राचं पाणीसुद्धा पेटवशील. ’

वर्ष १९६२. पं. जवाहरलाल नेहरूंच्या तीन मूर्ती निवासस्थानाच्या व्हरांड्यात एक तरुण त्यांची भेट घेण्यासाठी उभा असतो. योग्य वेळ होते. पंडितजींचा नोकर

त्याला हात धरून आत नेतो. पंडितजींना नमस्कार करीत तो म्हणतो– 'माफ करा, आपणाला युवर एक्सेलेन्सी म्हणावं की नुसतं पंडितजी म्हणावं हे मला समजत नाही.' पंडितजी त्याच्या पाठीवरून हात फिरवतात, हसतात आणि म्हणतात– 'हाक काहीही मारा.' मग ते त्याची विचारपूस करतात. तो सांगतो– 'मी दामोदर वाडेगावकर. मुंबई विश्वविद्यालयाचा एम. ए. एल. एल. बी. आहे. विलायतेत जाऊन आणखी शिकावं अशी इच्छा आहे. आपले आशीर्वाद घ्यायला आलो आहे.' पंडितजी त्याचं कौतुक करतात. 'वाडेगावकर, इंग्लंडला जरूर जा. शिका. यश मिळवा. पण एक गोष्ट लक्षात ठेवा. शिक्षण पुरं झालं, की भारतात परत या. तुमच्यासारख्या बुद्धिवंतांची देशाला गरज आहे.' वाडेगावकर परत येण्याचं आश्वासन देतो. पंडितजी सेक्रेटरीला काहीतरी सांगतात. बाहेर येता येता दोन हजार रुपयांचा चेक वाडेगावकरांच्या हातात पडतो. आणि मग ह्याच प्रसंगाची पुनरावृत्ति त्यावेळचे राष्ट्रपति डॉ. राधाकृष्णन् आणि उपराष्ट्रपति डॉ. झकीर हुसेन ह्यांच्याकडे होते. एका दिवसात परदेश–प्रवासाची रक्कम उभी करून वाडेगावकर लंडनला प्रस्थान ठेवतो.

लंडन विश्वविद्यालयाच्या इंटरनॅशनल लॉ विभागाचे प्रमुख प्रा. श्वाझेनबर्गर आपल्या विषयातला प्रकांड पंडित. जगात सर्वत्र नावाजलेला. 'दुनियेतल्या कोणत्याही देशात जा आणि श्वाझेनबर्गरचा विद्यार्थी होतो म्हणून सांगा. दुसऱ्या कोणत्याही सर्टिफिकेटची तुम्हाला जरूरी नाही.' असं आपल्या विद्यार्थ्यांना सार्थ अभिमानानं सांगणारा. पण थोडासा – थोडासा का बराचसा चक्रम – कारण त्याचा विद्यार्थी होता येणं हीच एक मोठी परीक्षा असते. तो देईल ती भाषणं ऐकणं, त्यांच्या नोट्स् बनवणं आणि परीक्षेच्या वेळी घोकमपट्टी करून ते पेपरात ओकून टाकणं ही परीक्षा-पद्धति तिथे नाही. वाडेगावकर लंडनला पोचला तेव्हा त्याचं इंटरनॅशनल लॉ चं ज्ञान सेकंड एल्. एल्. बी. च्या पन्नास मार्कांसाठी वाचलेला स्टार्कचा इंटरनॅशनल लॉ अधिक चार-पाच खास म्हणून वाचलेली पुस्तकं, एवढ्या पुरतंच मर्यादित होतं. पहिल्याच दिवशी श्वाझीनं वाडेगावकरवर बाँब टाकला– 'ग्लोबल कॉम्पेन्सेशन ही एक इंटरनॅशनल लॉ मधली टर्म आहे. तिच्यावरचं अद्ययावत साहित्य वाचून या आणि मला आठ दिवसांनी भेटा.' वाडेगावकरच्या इंटरनॅशनल लॉवरील तुटपुंज्या साधनसामग्रीत 'ग्लोबल कॉम्पेन्सेशन' हा प्राणी त्यांना कुठे भेटलाच नव्हता. तो कुठे सापडेल ह्याचा पत्ता सांगायची श्वाझीची तयारी नव्हती.

मग वाडेगावकर एका मित्राला घेऊन लायब्ररीत गेले आणि इंटरनॅशनल लॉ वरची पुस्तकं धुंडाळू लागले. त्यांचा एक इंग्लिश मित्र त्यांना पुस्तकं शोधून देत होता, वाचून दाखवत होता. पण तो बिचारा पडला सायन्सचा विद्यार्थी. थोड्याच वेळात तो कंटाळला. ती टर्मच कुठे सापडेना. लंडनच्या त्या थंड हवेतसुद्धा

वाडेगावकर घामाघूम झाला. सहज लंचच्या टाइमात त्यानं त्या मित्राला विचारलं, 'काय रे? श्वाझी कसा आहे रे? त्यालाच विचारून येऊ का कुठे सापडेल म्हणून?'

'मला काही खास माहीत नाही पण चक्रम आहे म्हणतात. विद्यार्थी अभ्यास करीत नाही असं दिसलं तर तो काढून टाकतो.

हे ऐकून वाडेगावकरच्या पोटात भीतीचा गोळाच उभा राहिला. त्यात त्या मित्रानं अशा प्रकारे साभार परत पाठवलेल्या दोन-चार आफ्रोएशियाई विद्यार्थ्यांची नावंसुद्धा सांगितली. प्रोफेसरनं नाकारलं म्हणून अपमानित होऊन हिंदुस्थानात परत जायचं—?

आणि मग पुढच्या आठ रात्रींचेसुद्धा दिवस झाले. मिळेल तो विद्यार्थी हाताशी धरून वाडेगावकर लायब्ररी धुंडाळत राहिला. आपोआप चिकार वाचन झालं. शेवटी ती टर्म एक ईस्ट युरोपियन जर्नलमध्ये सापडली. कोलंबसाला अमेरिका सापडली.

—आणि ह्या असा अभ्यास सुरू झाला. तो सतत चार वर्षं. सहकारी मित्र चांगले लाभले. वाचन करायला ते खूप मदत करीत. काय बिशाद होती इंटर नॅशनल लॉ ची. चार वर्षांनं श्वाझीचा हा भारतीय शागीर्द मायदेशी परत आला तेव्हा बेधडक म्हणू लागला—'आय् ब्रीद इंटरनॅशनल लॉ.'

लंडन विश्वविद्यालयाच्या एल्. एल्. एम्. मध्ये वाडेगावकर तिसरे आले. बॅरिस्टर झाले. त्यांनी इंडियन जर्नल ऑफ इंटरनॅशनल लॉ मध्ये प्रसिद्ध केलेल्या 'प्रिन्सिपल्स ऑफ कॉम्पेन्सेशन इन इंटरनॅशनल लॉ' ह्या निबंधाची सर्वत्र स्तुती झाली. तो निबंध केंब्रिज, लंडन, सिडनी, ऑक्सफर्ड इ. विश्वविद्यालयांच्या अभ्यास-क्रमात समाविष्ट करण्यात आला. मोठमोठ्या आंतरराष्ट्रीय कायद्याच्या पंडितांनी त्यावर टीका टिप्पणी केली. त्यांनी १९६९ साली प्रसिद्ध केलेला 'लीगल ॲस्पेक्टस् ऑफ आउटर स्पेस' हा निबंधही गाजला. आणि हे सर्व आयुष्याची तिशी ओलांडण्यापूर्वीच.

१९६७ साली हिंदुस्थानात परत आल्यावर वाडेगावकरांनी पहिली भेट तीन मूर्ती निवासस्थानाला दिली. पण – दिलेलं आश्वासन पूर्ण करून परत आल्याचं सांगायला पंडितजी तेथे नव्हते. मग ते इंदिराजींना भेटले.

पुढे एक वर्षभर सफदरजंग आणि पालम विमानतळावरील पायलट्स्ना वाडेगावकर 'लॉ ऑफ दि एअर ॲण्ड इंटरनॅशनल एअर ट्रान्स्पोर्ट' शिकवीत होते. अचानक एके दिवशी दिल्लीला काही कामानिमित्त आलेल्या प्रिन्सिपल टोप्यांशी त्यांची गाठ पडली. बॅ. वाडेगावकर हे एकेकाळचे प्रि. टोप्यांचे विद्यार्थी. प्रि. टोप्यांनी मग त्यांना मुंबईला आणायचं ठरवलं.

—आणि अशा रीतीने आम्हा मुंबईच्या कायद्याच्या विद्यार्थ्यांना एका चांगल्या प्राध्यापकाचा लाभ झाला.

हो, सांगता सांगता विसरूनच गेलो सांगायचं, की प्रा. वाडगावकर अंध आहेत खरं सांगायचं म्हणजे प्रा. वाडेगावकरांचं व्यक्तिमत्त्वच असं आहे, की त्यांच्या संबंधात आलेला प्रत्येक माणूस ते अंध आहेत हे विसरून जातो. ते स्वतः तर ही गोष्ट केव्हाच विसरून गेले आहेत. वयाच्या आठव्या वर्षी टायफाईडनं ते अंध झाले त्यावेळी ते नागपूरला होते. तेथून मग ते मुंबईला आले व विल्सन हायस्कुलात जाऊ लागले. तेथून पुढचा विल्सन कॉलेज, एल्फिन्स्टन कॉलेज, गव्हर्नमेंट लॉ कॉलेज आणि लंडन विश्वविद्यालय हा सारा शैक्षणिक प्रवास त्यांनी आपल्या सहकारी मित्रांनी केलेल्या वाचनाच्या मदतीनंच पार पाडला. कुशाग्र बुद्धिमत्ता आणि तीव्र स्मरणशक्ती याच्या जोरावरच त्यांना हे पार पाडता आलं.

पण ह्याहूनही महत्त्वाचं आहे ते त्यांच्या जीवनाचं तत्त्वज्ञान. त्यांनी आपण अंध आहोत हे सत्यच पूर्णपणे नाकारलं. जीवनातली सुखदुःखं ही एक पाय किंवा हात किंवा डोळा ह्यांच्यावर अवलंबून नसतात. ही इंद्रियं जीवनात आनंद मिळवायला सहाय्यभूत होत असली तरी ती इंद्रियं म्हणजे जीवन नव्हे किंवा त्यांचा अभाव म्हणजे जीवन नष्ट होणं नव्हे. दुर्दैवानं अकाली केलेला हा वार अशा तत्त्वज्ञानामुळंच ते झेलू शकले. ' अरे झुरळालासुद्धा डोळे असतात ' एकदा सहज ते म्हणाले. डोळा म्हणजे साधा कॅमेरा. तो नुसत्या बाह्य घडामोडींच्या प्रतिमा मेंदूत कोरतो. खरं दृष्टिज्ञान होतं मेंदूत. मग एकादी गोष्ट तुम्ही तुमच्या डोळ्यांनी पाहिलेली असो वा दुसऱ्याच्या. ' आणि ही गोष्ट इतकी खरी आहे, की डोळे असूनही माणसं जितकं पहात नाहीत तितकं वाडेगावकरांनी अंध असून पाहिलं आहे.'

मी ' त्यांनी पाहिलं आहे '' हा शब्द जाणूनबुजून वापरला आहे. त्यांचं म्हणणंच असं आहे, की अंधांच्या संदर्भातसुद्धा वाचणं, पहाणं असेच शब्द वापरावे म्हणजे त्यांचं अलगपण नाहीसं होईल. अंधाच्या बाबतीत वापरली जाणारी भाषा, त्यांचा पेहेराव, त्यांच्या इतर वस्तू, त्यांना दिलेली वागणूक इतरांहून अलग असूंच नये. नाहीपेक्षा ती एक अलग कनिष्ठ जातच निर्माण होईल. म्हणूनच वाडेगावकर कधी अंधांची काठी वापरीत नाहीत. काळा चष्मा लावीत नाहीत. त्यांच्या प्राध्यापकपदाच्या निवडीच्या वेळी झालेल्या वैद्यकीय तपासणीच्या वेळी मात्र एका डॉक्टरनं, ते अंध आहेत हे अर्जात नमूद केलेलं असूनसुद्धा त्यांना त्यांच्या चष्म्याचा नंबर विचारला होता! बिरबलाच्या गोष्टीत सांगितल्याप्रमाणे जगात एकंदर आंधळ्या डोळसांची संख्या बरीच आहे हे मात्र खरं.

अंधांनी संगीताचा अभ्यास करायचा हे जवळजवळ सर्वत्र ठरूनच गेल्यासारखं आहे. लहानपणी शाळा-कॉलेजात असताना वाडेगावकरांनीही संगीताचा अभ्यास केला. त्यांचा शास्त्रीय संगीताचा अभ्यास प्रो. बी. आर्. देवधरांकडे झाला. त्यांनी तबल्याची तालीम फरुकाबाद घराण्याचे खलीफा उस्ताद खाँ साहेब अमीर हुसेन खाँ यांच्याकडे घेतली. ऑल इंडिया रेडिओवर सोलो तबल्याचे कार्यक्रम झाले. उस्ताद अमीर खाँ, हलीम जाफर खाँ यांच्यासारख्या मातब्बरांना त्यांनी त्या काळात

तबल्याची साथ केली. पण एकदा कायद्याच्या क्षेत्रात प्रवेश केल्यावर त्यांनी संगीताच्या क्षेत्राकडे पूर्णपणे पाठ फिरवली. संगीताच्या क्षेत्रातील पु. लं. सारखी मंडळी त्यांच्या ह्या निर्णयाबद्दल आजही त्यांच्यावर नाराज आहेत. कारण वाडेगावकरांच्या लांबसडक बोटांत अक्षरश: जादू आहे. यांच्या ह्या निर्णयाला अपवाद फक्त एकाच घटनेचा. ज्योत्स्नाबाई भोळे इंग्लंडला गेल्या होत्या आणि तिथे त्यांना चांगला तबलजी मिळत नव्हता. तेव्हा वाडेगावकरांनी त्यांना इंग्लंड-मध्येच नव्हे तर युरोपातील इतर देशात जाऊनही साथ केली.

कायदा म्हणजे एक सोशल सायन्स. कोणत्याही सोशल सायन्सच्या अभ्यास-काला एक सामाजिक दृष्टी असावी लागते. प्रा. वाडेगावकरांनी त्यांचं लग्न झाल्या-वर कॉलेजात एक पार्टी दिली. ह्या पार्टीच्या वेळी प्रथम चतुर्थ श्रेणीच्या नोकर-वर्गाला, मग तृतीय श्रेणीच्या कर्मचाऱ्यांना आणि शेवटी आपल्या सहकारी प्राध्या-पक वर्गाला खायला घातलं.

असा छोटासा प्रसंगसुद्धा प्रा. वाडेगावकर कशा प्रकारचा सामाजिक दृष्टिकोन बाळगतात याबद्दल बरंचसं सांगून जातो. □ □



मनोविकारशास्त्र

# व्यक्तिमत्त्व

## जडणघडण आणि विकास

डॉ. प्रकाश श्री. साठये

माणसाच्या व्यक्तिमत्त्वाबद्दल सर्वसाधारण कल्पना अशी, की त्याचा अंगबांधा त्याचे दिसणे म्हणजे व्यक्तिमत्त्व ! उजळ वर्णाचा, उंचापुरा, धडधाकट माणूस पाहिला, की आपण म्हणून जातो ' वा ! काय टॉप पर्सनॅलिटी ' आहे. हा झाला त्याच्याबद्दल प्रथमदर्शनी ग्रह. पण शास्त्रीयदृष्टचा पहायचे झाले तर आपल्याला इथे थांबून भागायचे नाही. त्याच्या आणखी काही गोष्टी विचारात घेतल्या पाहिजेत. कारण व्यक्तिमत्त्वात काही घटकांचा अजोड असा मिलाफ झालेला असतो. त्यात त्याचा अंगबांधा, रूप, वर्तनप्रवृत्ती, बौद्धिक समता, कौशल्य, छंद, सवयी, आवडी-निवडी, मनाचा कल, मनोसामर्थ्य या सर्वांचा, विशेषत: सामाजिक दृष्टिकोनातून विचार करायला हवा.

माणसाच्या व्यक्तिमत्त्वाचा अभ्यास केल्यावर आपल्याला त्याचे वागणे, बोलणे, समजणे सोपे जाते. दुसरे असे, की रोगनिदान करण्याच्या दृष्टीने त्याचा फार उपयोग होतो. इतकेच नाही तर ' त्या रोगातून तो केव्हा बरा होईल, कितपत होईल, पूर्ण बरा झाला तर पुन्हा त्याला असा त्रास होण्याची शक्यता आहे का ? असल्यास केव्हा होईल ? ' या संबंधीचे आडाखे त्यावरच अवलंबून असतात आणि मनोविकार चिकित्सकावर तर रुग्णांच्या नातेवाईकांकडून याच प्रश्नांची सरबत्ती होत असते.

माणसाचे व्यक्तिमत्त्व घडवायला वंशदाय (hereditory) गोष्टी आणि त्याची परिस्थिती (environment) कारणीभूत असतात. त्याची शरीरप्रकृती, उंची, वर्ण, बुद्धी, वर्तनप्रवृत्ती इत्यादी गोष्टी वंशदाय असतात. त्यांचा उपयोग कसा, किती व केव्हा होतो, त्यांना कितपत वाव मिळेल, त्यांची कितपत वाढ होईल हे परिस्थितीवर अवलंबून असते. ' लहान मूल म्हणजे मातीचा गोळा. त्याला आकार द्यावा तशी मूर्ती घडते ' हे ' रायगडला जेव्हा जाग येते ' मधले वाक्य आठवते ना ?

फार महत्वाचे आहे. आकार देणे हे परिस्थितीच्या हातात असते. पण मातीचा प्रकार, कस मात्र वंशदाय असतो. चुनखडीच्या भसरट मातीपासून चांगल्या विटा-देखील तयार होत नाहीत तर सुंदर मूर्ती घडवणे दूरच राहील ! वंशदाय गुण महत्त्वाचे की परिस्थिती, हा शास्त्रज्ञांत वादाचा विषय आहे. पण चलाख माळ्याला तुम्ही विचारलेत, की 'उत्तम पीक काढायला तुला चांगली माती, खतपाणी लागेल का चांगले बियाणे ?' तर तो हसून उत्तर देईल 'साहेब, दोन्ही हवेच की !'

अभ्यासाच्या आणि वर्णनाच्या सोयीसाठी म्हणून व्यक्तिमत्त्वाचे भाग पाडले जातात. त्यातला पहिला भाग म्हणजे सुप्तात्मा (Id). हा माणसाच्या जन्मापासून अस्तित्त्वात असतो. यांत वंशदाय गोष्टींचा वाटा मोठा. याला एकच तत्व ठाऊक. ते म्हणजे आनंद-सुख मिळवणे (Pleasure principle). मग त्यासाठी काहीही करायची त्याची तयारी असते. तो नीती, शील, तर्कशास्त्र, शक्याशक्यता, सामाजिक रुढी, या बाबतीत अनभिज्ञ असतो. इच्छा झाली, की पुरी झालीच पाहिजे असा याचा खाक्या, कुठल्याही प्रकारचा त्रास, ताण, अडचण याला सहन होत नाहीत. झालेली इच्छा वास्तवात पुरी झाली नाही तर तो कल्पना, मनोराज्य व स्वप्ने यांचा आधार घेतो. शारीरिक गरज निर्माण झाली, की ती पुरी करायची एवढेच लहान मुलाला कळते. लघवीला किंवा परसाकडे लागली, की करून टाकायची; भूक, तहान किंवा थंडी वाजायला लागली की भोकाड पसरायचे. एवढेच त्याला माहीत ! पण हुशार आई त्याला वेळच्यावेळी बाहेर धरून लघवीपरसाकडेची सवय लावते. मूल रडायला लागले, की ते भुकेमुळे रडतेय की तहानेमुळे, त्याला झोप आलीय म्हणून का थंडी वाजतेय म्हणून हे ती लगेच ओळखते. दीड वर्षापर्यंतचे मूल म्हणजे Id चं राज्य समजावे.

मूल जसे मोठे व्हायला लागते तशी त्याला परिस्थितीची जाणीव होऊ लागते. दरवेळेला रडले की दूध मिळत नाही, थांबावे लागते. हे त्याला कळू लागते. अंथरुण भिजवले किंवा कपडे भिजवले, की आई ओरडते, फारच चिडली तर मारतेदेखील, हे समजायला लागते. पण हळूहळू हे कार्यक्रम पुढे ढकलायला ते शिकते. दुधाची वेळ होईपर्यंत थांबणे त्याच्या अंगवळणी पडते. हे सगळे होते त्याचे कारण व्यक्तिमत्त्वाचा दुसरा भाग घडायला सुरुवात झालेली असते. त्याचे नाव स्वयंभाव (Ego). 'राजू' म्हणून मारलेली हाक आपल्यासाठीच आहे हे त्याला कळू लागते. शारीरिक, मानसिक गरजांचा परिस्थितीशी मेळ घालणे हे याचे तत्त्व ! (reality principle). वंशदाय गुण आणि त्यांची परिपक्वता (maturation) या स्वयंभावाच्या विकासाचा मार्ग ठरवतात. त्या गुणांची जाणीव होते ती अनुभव, तालीम न् शिक्षण यांच्यामुळे ! आपण पुढे कोण व्हायचे हे मूल आसपासच्या व्यक्तींकडे पाहून ठरवते. इंजिनियरच्या छोट्या मुलाला तुम्ही विचारलेत, की 'तू कोण होणार ?' बोबड्या बोलात तो सांगतो 'मी अिंजिनल होनाऽल.'

पण हाच इंजिनियर जर सुखीसमाधानी नसेल–कारणं काही का असेनात–स्वतःच्या व्यवसायाला विटलेला असेल तर तो मुलाला तसे म्हणू देणार नाही. तो म्हणेल, कशाला इंजिनियर होतोस बाळा ? डॉक्टर हो ' मग तो छोटा पुढच्या वेळेला सांगेल, ' डॉक्तल होनाऽल. '

या विकसनशील आणि आकार्यक्षम वयात मुलाच्या सहवासात ज्या व्यक्ती येतात त्यांच्याकडून तो बऱ्याच गोष्टी कळत नकळत शिकतो. याबाबतीत लहान-मुले टिपकागदासारखी किंवा स्पंजासारखी असतात. काय पाहतील ते टिपून घेतात. किंवा त्यांच्या सहवासात येणाऱ्या माणसांचे अनुकरण करतात. कारण आई-वडील, आजी-आजोबा, शिक्षक ही माणसं त्यांच्यासमोर आदर्श प्रतिमा (Ego-ideal) म्हणून उभी असतात. मुले हळूहळू मोठी होऊ लागली, की ' सगळंच आपलं ' आहे, आई कुणाची, बाबा कुणाचे, आजी कुणाची, आजोबा कुणाचे या प्रश्नांना ' माऽझे ' हे उत्तर देणे कमी होते. बाबा जसे आपले आहेत तसे दुसऱ्यांचे आहेत हे त्यांना कळू लागते. म्हणून तर आपली खेळणी एकमेकांना देऊन ती खेळू लागतात.

मुले मोठी होतात तशी त्यांच्या चुका पोटात घालण्याची मोठ्या माणसांची प्रवृत्ती कमी होते. चुकीच्या कृत्याबद्दल त्यांना शिक्षा होते. मग आपण करतो ती गोष्ट योग्य की अयोग्य, ती केल्यावर आपले कौतुक होईल का आपल्याला शिक्षा होईल याचा विचार ती करू लागतात आणि व्यक्तिमत्त्वाचा तिसरा भाग–ज्या आदर्शाला (Superago) किंवा सद्सदविवेक म्हणतात–आकार घेऊ लागतो. हा आकार, मुलाला लावली जाणारी शिस्त, त्याचे होणारे कौतुक, घरातले संस्कार, रीती, नीतिनियम आणि वातावरण यावर अवलंबून असतो. एखाद्या मुलाने दुसऱ्याच्या घरी गेल्यावर खायला मागितले तर घरी गेल्यावर त्याला शिक्षा होते. दुसऱ्याकडे गेल्यावर खायला मागणे चूक आहे, शिक्षा होते हे त्याला कळते. शिक्षा–मग ती कुठल्याही प्रकारची असो (अबोला, कानपिचकी)–मुलाला कमीपणा वाटतो. चुकीबद्दल टोचणी लागते. ती चूक पुन्हा न होऊ देण्याचा ते प्रयत्न करते

माणसाचे व्यक्तिमत्त्व, वर्तन हे ते या तीनपैकी कोणता भाग जास्त प्रभावी कार्यशील आहे यावर अवलंबून असते. Id प्रभावी असेल तर माणूस हट्टी, दुराग्रही, सामाजिक नीतिनियमांची भिती न बाळगणारा, बालिश आणि गुन्हेगारप्रवृत्तीचा होतो. Superego चे पारडे जड असेल तर तो वक्तशीर, शिस्तप्रिय, पापभीरू विचार करणारा, स्वतःला त्रास करून घेणारा असा होतो. Id किंवा Superego यांचा अतिरेक केव्हाही वाईट. कारण अशा व्यक्ती मनोरुग्ण होण्याची शक्यता जास्त असते. ego प्रभावी असणारा माणूस हा आपल्या सर्व गुणांचा, सामर्थ्याचा परिस्थितीशी योग्य मेळ घालून जीवनात अतिशय यशस्वी होतो.

लहान मुलांच्या खालील गरजा पुरवल्या जाणं त्यांच्या योग्य विकासाच्या


मुलायम
नि नरम,
पण अतिशय
टिकाऊ
स्वस्तिक
एअर-ओ-फिल
चप्पल
तुमच्या
पाउलांची
शोभा वाढविते!
तुम्हाला चालताना मुळीच अडखळल्यासारखे वाटू नये, अवघडायला होऊ नये, उलट अगदी आराम वाटावा म्हणून खास कुशलतेने तयार केलेली स्वस्तिकची नवीन एअर-ओ-फिल रबर चप्पल तुमच्या पाउलांना कशी मऊमऊ वाटते नि सुखविते. तिची किंमतही किती माफक-सर्वांना परवडेल अशीच! कुटुंबातील सर्वांची आवडती चप्पल!
पुढील साइझेसमध्ये मिळते.
पुरुषांसाठी: ७/१०,
स्त्रियांसाठी: ३/६,
मुलांसाठी:९/२,
स्वस्तिक स्वस्तिक रबर प्रॉडक्टस् लिमिटेड, चिंचवड, पुणे-१९.

दृष्टीने महत्त्वाचे आहे.

१ : मातापित्यांचे प्रेम, वात्सल्य व जिव्हाळा या गोष्टींमुळ आपण कुणीतरी हवे-हवेसे आहोत ही भावना त्यांच्यात निर्माण होते.

२ : स्वावलंबनप्रियता व सुरक्षिततेची भावना–' माझे दात मी घासणार, माझा दुधाचा कप मी जागेवर ठेवणार, मी माझा भांग पाडणार ' असं म्हणणाऱ्या मुलाला ' तुला काय येतेय ' म्हणून उडवून न लावता त्याला समजावून, वेळी उत्तेजन देऊन स्वावलंबी होण्यास मदत करायला हवी. आपल्याला काही झालं तर आपल्या पाठीशी आईवडील आहेत असे त्यांना वाटले पाहिजे.

३ : दखल, कौतुक, उत्तेजन – मुळात केलेल्या चांगल्या गोष्टीची (मग तुमच्या दृष्टीनं ती किती का फालतू असेना) दखल घेतली जाणे फार महत्त्वाचे आहे. दोन पायऱ्यांवरून उडी मारून ' मी कशी उडी मारली ' असे म्हणत ते जेव्हा कौतुकाच्या अपेक्षेने तुमच्याकडे पहाते तेव्हा ती अपेक्षा पुरी व्हायला हवी. ' ए, उगाच पाय मोडून घेशील ' म्हणून डाफरता कामा नये. चांगल्या कृत्यांचे कौतुक झाले, त्यांना उत्तेजन मिळाले, की त्यांच्यात चांगले काम करण्याच्या वृत्तीची जोपासना होते.

४ : सुसंगत शिस्त – मुलांना शिस्त लावण्यात सातत्य, संगती हवी. ती नष्ट झाली, की बरोबर कोणते, चूक कोणते हे त्यांना कळेनासे होते. ती गोंधळून जातात.

स्वच्छतेच्या सवयी लावण्याचा काळ (toilet training) आणि घरात नव्या भावंडाचे आगमन या काळात मुले अतिशय हळवी, भावनाप्रधान होतात. म्हणून या काळात वरील गोष्टींची काळजी डोळ्यात तेल घालून घेणे आवश्यक ठरते.

आता चुकीच्या गोष्टी कोणत्या ? त्यांची कारणे, परिणाम काय काय होतात पहा–

फाजील काळजी, रक्षण व लाड (over protection and pampering). लाडांमागची भावना वाईट नसते. लहानपणी आपल्याला जी झळ लागली ती मुलाला सोसावी लागू नये, आपल्या अपुऱ्या आकांक्षा त्यांनी पुऱ्या कराव्यात या आईबापांच्या इच्छांमुळे ते घडते. काही वेळा पतिपत्नीत कलह असतील तर आई मुलांवर जास्त लक्ष केंद्रित करून त्याची जास्त काळजी घेते. काही वेळा मूल पायगुणी किंवा बऱ्याच वर्षांनी झालेले किंवा मुलगा असल्यामुळेही त्याचे लाड होतात. अशी मुलं आयांच्या अंगावरून उशीरा तोडली जातात. ती ' घोडी ' झाली तरी त्यांना अंघोळ घालणे, कपडे घालणे, भरवणे हे कार्यक्रम चालू असतात. त्यांना थोडीदेखील मोकळीक मिळत नाही, मोठ्या माणसांचा धाक त्यांना नसतो. या गोष्टीमुळे मुले खुरटतात, परावलंबी, एकलकोंडी, समाजात जायला भिणारी, कुढी होतात. त्यांच्या आईवडलांनी जणू त्यांना पांगळे बनवलेले असते.

नापसंती (rejection)–ही मुले नाईलाज म्हणून वाढवली जातात. प्लॅनिंग फसल्यामुळे झालेली, मंदबुद्धी, विवाहबाह्यसंबंधातून झालेली, कुलक्षणी, पांढऱ्या

पायाची, सावत्र आणि व्यसनाधीन बापाची मुले या सदरात मोडतात. त्यांची वर्मे, दोष काढून त्यावर बोट ठेवण्यात पालक समाधान मानतात. त्यांच्या संगोपनाकडे, शिक्षणाकडे दुर्लक्ष केले जाते. त्यांना वाजवीपेक्षा कडक शिक्षा होते. सारख्या शिव्या बसतात. त्यांचे कौतुक बाजूलाच राहिले पण दुसऱ्यांशी गैर, अस्थानी तुलना करून त्यांच्या आनंदावर, अभिमानावर बोळा फिरवला जातो. शारीरिक वर्णनाला साजेशी, काळ्या, लंगड्या, अशी नावे त्यांना पडतात. शक्य असेल तर त्यांना बोर्डिंगमध्ये टाकून दिले जाते.

अशा मुलांत मोठ्या माणसांबद्दल आदर, प्रेम, धाक या भावना निर्माण होत नाहीत. ती क्रूर, निर्दय होतात. 'जी गोष्ट मला लहानपणापासून पहायलादेखील मिळाली नाही ती (दया) मी दुसऱ्यावर कशी करणार?' असा प्रश्न विचारणारे, गडकऱ्यांच्या भावबंधनातले घनश्याम निपजतात. शिक्षा चुकविण्यासाठी खोटे बोलणे, शाळा बुडवणे, चोऱ्या करणे, सिनेमा पहाणे, जुगार खेळणे अशा संवयी त्यांना लागतात. मग या मुलांच्यातून पुढे सराईत गुन्हेगार, समाजकंटक निर्माण होतात.

अनियमित शिस्त (Inconsistent discipline)–शिस्तीमध्ये सातत्य नसेल तर मुले गोंधळून जातात. 'मागच्या वेळी दुसऱ्याकडे गोळी मागितली तर आई नुसते हसली आणि आज मागितली तर पाठीत धपाटा बसला.' असे का होते हे मुलांना कळत नाही. त्यांच्या चुका त्यांना समजावून सांगितल्या पाहिजेत. ज्या घरात आजी-आजोबा असतात त्या घरात विशेषत: असे घडते. आईबाप मुलांना शिस्त लावायला गेले, की आजी-आजोबा (मुलांच्यादेखत) त्यांनाच बोलतात, नातवंडांची कड घेतात. त्यांना पाठीशी घालतात. अशाने मुले शेफारून जातात. आईवडलां-बद्दल त्यांना धाक किंवा आदर वाटत नाही.

जिज्ञासा दाबणे (prevention of curiosity).–लहान मुले, 'हे काय? ते काय? ते तसं का? कशासाठी?' असे प्रश्न विचारतात. त्यांची जिज्ञासा, 'उगाच वेड्यासारखं विचारू नकोस' असे म्हणून दाबली जाते. त्यांना कळेल अशा शब्दात व शांतपणे त्यांच्या प्रश्नांची उत्तरे दिली जात नाहीत. यामुळे ती आत्मकेंद्रित होतात.

तुम्ही डोळे उघडे ठेवून पाहिलेत तर तुमच्या आसपास, तुमच्या दैनंदिन जीवनात या गोष्टी तुम्हांला दिसतील. त्या टाळल्या गेल्या पाहिजेत. या चुकांमुळे मुलांचे नुकसान होणार आहे व तुमच्या चुकांचे प्रायश्चित्त त्यांना भोगायला लागेल हे विसरून चालणार नाही.

□ □ □

# कविता

## माणूस : एक ऊनसावली

चिन्तन : बाबा आमटे

कालचक्राला न गवसलेला असीमाचा किनारा
आपल्या सीमित अपूर्णतेने गाठण्याचा
प्रयत्न करणारा : माणूस !
मर्यादित ताकदीने
अमर्याद काळाचा एक तुकडा चवीने चघळणारा :
तोही एक माणूस.
पण असीम परिपूर्णतेचा त्याचा ध्यास
घडवून आणतो मन्वन्तरांचे इतिहास.
तणीसात आंबे पिकू घालतात
तसे त्याचे पाडाला आलेले सद्‌गुण
दुर्गुणांच्या माचात पिकत असतात.
अपमानाच्या धुळीत तो नेहमीच पेरला जात असतो
ऊन-पाऊस-वादळाच्या मान्याशी
त्याच्या अनुभवाचे ओबडधोबड खडक
झुंजत असतात.
शिशिराची शोकांतिका माणसाला थरकावत असते
वसंताच्या सुगंधी लाटांवरची सुषमा निरखत
तृप्तीच्या रंगमायेवर तो लहरत असतो.
नवजात अर्भकाच्या पहिल्या श्वसनासारखी
निरागसता प्यालेला तोच कधी कधी
हत्या करतो, मांबावून मांगल्य पायदळी तुडवत जातो.

तेव्हा आस्तित्वाच्या सापळचात येरझारा घालणारा
आपल्याच तिमिराची शिकार होत असलेला :
तोही एक माणूस !
समृद्धीचे अराजक आणि भुकेची वणवण,
उल्हास आणि अपरिमित वेदना,
यांचे संगोपन करणारा,
मोहाच्या वासनाचक्राने सारे माणूसपण
पिंजून निघणारा : तोही एक माणूस !
पण त्या पाप्याच्या कबुलीजबाबालाही एक उःशाप असतो
ज्या मातीतून साधुपुरुष जन्माला येतात
त्याच मातीतून तोही आलेला असतो !
स्वतःच्या अंधारलेल्या प्रतिमेचे
माणूस कधी थडगे उभारतो.
स्मृतिशिलेवर लिहितो–
" यात दफनविले आहेत ते विमोहाचे भुभुत्कार
कुजलेलें असत. हे उकरू नका. घृणा येईल. "

आपल्या आत्म्याच्या स्फटिकपैलूतून
स्वतःची निष्पापता पाहू शकणारा,
ज्या डोळचात क्रोधाग्नी भडकतो,
त्याच डोळचात करुणेचे भाव
मधमाशीच्या पारदर्शी पंखासारखे तरळत असणारा
: तोही एक माणूस !
विषमतेने पिचलेल्यांच्या,
लाचारीने पडझड झालेल्यांच्या सुपीक भविष्यासाठी
प्रदीप्त अंधारातही प्रकाशाचे कोंभ जपण्यासाठी
तो झेपावत जात असतो.
कधी रणक्षेत्रावर जायच्या आधीच
तो पलायन करीत असतो !
कधी जनावरासारखा स्वार्थाने जगत असतो.

परस्परातली भावभिनी अंतराळे ओलांडूनही
आपण कोण हे माणसाला हे कळत नसते !
उपभोग आणि समर्पण ह्या परस्पर विरोधी
टोकांची गुंफण करता करता,
कधी कधी आपल्या दंतूर आसक्तीच्या प्रवाळलेल्या
किनाऱ्यावर ठोकरा खात,
रक्तबंबाळ होत असतो : तोही एक माणूस !
पेशी जाळणाऱ्या अन्यायाच्या
घर्षणातल्या ठिणग्या
दीप्तिमान करण्यासाठी
प्रत्येक रक्तथेंब उसळत असतो
आपली दुर्बलता, वैभव, अगतिकता, महती, शांती ..
या सर्वांना तिलांजली देत,
झेपावत, उसळत, जळत
प्रशांत जिंकणारा : तोही एक माणूस !
सुप्त क्षणांती दिलेला संकेत पाळत
तो आगेकूच करीत असतो
पलिकडले त्याला केवळ संघर्षाचे
सूर्योदय दिसत असतात.
अनिश्चितता हीच एक शाश्वती
त्याच्या समोर असते
पण त्याची पावले गुहेची वाट धरत नसतात
आणि उद्यासाठी विचारांचे पाथेय
वाहून नेण्याच्या लोभात रेंगाळू नकोस,
असेही स्वतःला निक्षून बजावत असतो.
निकडीच्या स्फुल्लिंगाशी बांधला गेलेला
: तोही एक माणूस !

विलेखन—मधुकान्त


मानव धर्म वाढवावा...

आशा गेली अन् माझ्या मनाचं आकाश निराशेच्या ढगांनी झाकोळून आलं. अनेक प्रश्न नागासारखा फणा काढून उभे राहू लागले. आशा वेष पालटूनच का आली ? आता ती माझ्याशी लग्न करणार का ? किती विलक्षण म्हणू तिला ! वधूनं वराची परीक्षा कधी घेतल्याचं मी ऐकलं नाही, वाचलं नाही. डोळे बंद करून बसलो तरी ती समोर असल्याचा भास होत होता. तिचं सुंदर रूप डोळ्यांच्या कॅमेऱ्यानं टिपलं होतं. हृदयानं जपलं होतं. आवाज किती मधुर ! शब्दाऐवजी तिच्या कंठातून मध स्रवत आहे असं वाटत होतं. विजेसारखी आली अन् गेली. अन् गेल्यावर समजलं की ती आशा होती.

अमरावतीला जाण्याचं प्रयोजन नव्हतं. मी तिच्या वडिलांना झालेला प्रकार कळविला. पत्र मिळताच तिचे वडील धावत आले. म्हणाले, " पोर लहानपणापासून अवखळ आहे, खेळकर आहे. आपला अपमान करावा असा काही तिचा विचार नव्हता. माणसाला अक्कल येते ती अनुभवाने, केवळ शिकल्याने नव्हे. तेव्हा तिला क्षमा करा. " ते गेल्यावर अशाच आशयाचं आशाचं पत्र आलं. माझं समाधान झालं.

---

## बोलके शंख

**कुंदन पुरी**

**उत्तरार्ध**

---

३० मेला आमचं लग्न झालं. सारी तयारी अल्पावधीत झाली. श्रीमंतांना अशक्य काय त्यात ?

आमच्या जीवनातील पहिली रात्र. अनेक भावनांच्या मिश्रणामुळे मन गोंधळलेलं...भिती, लज्जा, उत्साह. अननुभवी. काय बोलावे हे कुणालाच सुचेना. ती माझ्या बाहूत विसावली होती. फक्त डोळे एकमेकांच्या मनातील भाव जाणून घेण्याचा प्रयत्न करीत होते. मला कंठ फुटला. मी पुटपुटलो, " आशू ऽऽ ! "

" अं ऽऽऽ ! "

" आशू ऽऽ ! ऽऽ या बोलक्या शंखाशी लग्न का केलंस ?"

तिनं स्मित केलं. माझ्यापासून दूर झाली. लाजली. नजर खाली वळलेली.

हळूच बोलली, "हे आत्ताच कशाला विचारता ? या आनंदाच्या क्षणी...मला वाटतं की काहीच बोलू नये. आपल्या मिठीत असंच अनंत कालपर्यंत विसावत राहावं.. "

मला जाणून घेण्याची तीव्र इच्छा होती. तिचा उजवा हात माझ्या हातात घेत मी म्हटलं, "नाही आशू ! मला समजलं पाहिजे. आपण एकमेकाला जाणून घेतलं पाहिजे."

"आयुष्य पडलंय् एकमेकांना जाणून घ्यायला...!"

"छे, छे. मला आत्ताच कळलं पाहिजे.. "

खरं म्हणजे ती कुठल्याच प्रश्नाला उत्तर देण्याच्या मनस्थितीत नव्हती. माझं मन हट्टाला पेटलं, "मला जाणून घ्यायचं आहे, की तू वेष बदलून का आली होतीस ? कपडे कोठून मिळविलेस ? माझ्याशीच लग्न का केलंस ? माझ्यावर तू प्रेम करतेस का ? असल्यास कारण.. ?"

"काय प्रश्न विचारला आहे पण ? तुमच्यावर प्रेम करू नको तर कोणावर .." तिनं हसत म्हटलं, "बरेच हट्टी दिसता की...निरर्थक गोष्टीसाठी तुम्ही एवढे अडता तर स्वार्थी गोष्टीसाठी किती अडाल कुणास ठाऊक..."

—आणि आम्ही दोघेही खळाळून हसलो.

ती सांगू लागली, "माझ्या आत्याचा मुलगा – प्रकाश – आजारी होता. त्यांना पैशाची गरज होती. म्हणून बाबांनी मला पैसे देऊन पाठविले. तुम्हांला बघण्याची आयडिया माझीच. जुनी 'बघण्याची' परंपरा अळणी अन् टाकावू आहे.. मॅनेजरची वागणूक बघावयाची असेल तर त्या संस्थेचा डायरेक्टर म्हणून जाऊ नये... जावे चपराशी बनून... "मानव धर्म वाढवावा"चा लेखक कसा आहे हे बघण्यासाठी तेच उत्तम झालं...आत्या जेथे राहते तेथे जवळच एका शेतकऱ्याचा मोठा वाडा आहे. आत्याची तिथं चांगली ओळख. त्या शेतकऱ्याची बायको बघून मला तुमची 'गंमत' करण्याची इच्छा झाली. तिचे दागिने व कपडे घेतले. त्यात तुमचा अपमान करण्याचा माझा उद्देश नव्हता..."

"तुला काय वाटले की मी महामानव आहे ? डोंगर पोखरून उंदीर मिळाल्यासारखं झालं असेल...बोलणं अन् वागणं यातील फरक बघून वाईट वाटलं असेल ?" मी विचारलं.

"अगदीच प्रामाणिकपणे बोलायचं तर खरंच खूप वाईट वाटलं. सारेच बोलतात पण तसं कुणीच वागत नाहीत. वाटलं, तुम्ही काही वेगळे असाल. प्रत्येक तरुणीला आपला प्रियकर फार वेगळा आहे असंच सुरुवातीला वाटतं.. माझंही तेच झालं. तुमचं पत्र घरी आलं. कधी नव्हे ते बाबा त्या दिवशी खूप बोलले. संतापले... "अगोदरच चांगली मुलं मिळत नाहीत, जो सापडला तोही गमावणार.. कोण हिरा सापडणार तुला "...मग मला जवळ घेतलं. डोक्यावरून हात फिरवत

-म्हणाले, "तू आता लहान नाहीस. लेक्चरर म्हणून तू काम करतेस. असा खोडकर पणा शोभत नाही. दिवस-रात्र समाज-सुधारणांच्या गप्पा मारणारे समाजसुधारक जसं बोलतात तसं वागत नाहीत. तिथं यशवंतची परीक्षा कशाला? शिवाय एखाद्या अनोळखी बाईबरोबर कोण लग्नाला तयार होईल? तू तरी एखाद्या काळ्या अन् अशिक्षित पुरुषाशी लग्न करशील का? नाही. ज्याला त्याला जगातली चांगली वस्तू हवी."...माझी चूक मला समजली..."

ऐकत असताना माझा चेहरा पडला. बापाच्या सांगण्यावरून हिनं माझ्याशी लग्न केलं तर? पुरुषाच्या गुणावर, शौर्यावर एखादी स्त्री भाळली तर ती अभिमानाची बाब आहे. हिला त्या वेळी एकही गुण माझ्यात आढळला नाही का?

मी म्हटलं, "काही का असेना? तुझं ते नाटक फार जमलं होतं...कधी नाटकात काम केलं होतंस का?"

"पुष्कळ नाटकात मी कामं केली. शाकुंतल, शारदा, संशयकल्लोळ, एकच प्याला, सुंदर मी होणार, तुझे आहे तुजपाशी...अनेक नाटकांतून मी मुख्य भूमिका केल्यात. बक्षिसं मिळालीत...नाटकाचे फोटो आहेत माझ्याकडे ..बघायचे आहेत?"

तिच्या उत्साहाला सीमा नव्हती.

आणि माझ्या कपाळाला आठ्या पडल्या. कसली बायको मिळाली? नाटकी–अनेक नाटकांतून कामं केलेली. अनेक पुरुषांच्या सहवासात आलेली. म्हणजे काय? एक वर्ष नोकरीत घालवलंय! सत्तावीस वर्षांची...नक्कीच हिचा पाय घसरला असेल. स्त्री म्हणजे वासनांची खाण...दुष्ट विचारांच्या चक्रानं गती घेतली. संशय नागिणीचा जन्म झाला. प्रीतीला ओहोटी लागली. जेव्हा आशा माझ्यापासून दूर होती तेव्हा माझं मन तिच्या भोवतीच फिरत होतं. अन् आत्ता? आम्ही अगदी जवळ असून मी दूर गेलो आहे. माझं मन दूर कुठंतरी भटकत आहे.

आशा बावरली आहे. डोळ्यांत कारुण्य आहे....पुरुषत्वाला आव्हान आहे... पण माझं मन संशयानं जळत आहे. अंगातली शक्ती संपली आहे.

"अहो, रागावलात काय? मी खरं ते सांगितलं...!"

"नाही. रागवायला काय झालं?" मी उगीचच स्मित केले.

"मग तुम्ही बोलत का नाही. चेहरा पडलाय तुमचा. काही दुखतं का?"

"हंऽऽ. डोकं दुखत आहे."

"बाम लावू का?"

"नको. विश्रांती हवीय."

–आणि प्रथम-रात्र संपली.

माझं मन अति संवेदनाक्षम आहे. थोडंसं मनाविरुद्ध झालेलं मला खपत नाही. येथे तर सारंच चुकलं. माझ्या भावनांचा बगीचा नष्ट झाला. स्वप्न भंगलं. अपेक्षाभंगाएवढं दुसरं दुःख नाही. माझ्या स्वप्नातील हृदयेश्वरी मला मिळाली नाही.

मन आक्रोश करून उठलं, की माझ्यासारख्या सात्विक माणसाला हे काय मिळालं ? हेचि फळ काय मम तपाला...होय, तप. मी पण स्वैराचारी बनू शकलो असतो. माझे संस्कार अन् ध्येय यामुळे मी बचावलो.

माणूस ज्या आचारविचारात वाढतो, तसाच बनतो. आम्ही ब्राह्मण, शास्त्री. पोथ्यापुराणं वाचणारे माझे वडील. घरातलं वातावरण अगदी पारंपारिक. मी मॅट्रिक झालो त्या वेळी रामायण, महाभारत आणि असेच काही ग्रंथ, पोथ्या वाचून झाले होते. मला त्यातील अक्षर न् अक्षर खरं वाटायचं. सगळे लोकोत्तर पुरुष माझे आदर्श. त्यांतील स्त्रिया माझं पूज्यस्थान. आपण देखील आदर्श पुत्र, भाऊ, पती व्हावं, सीता सावित्री सारखी पत्नी मिळावी, असं मला वाटू लागलं.

शिवाय भाऊ बी. एस्‌सी. झालेच नाहीत. मी बी. ए. व्हावं, एम्. ए. व्हावं अन् बाबांची शाबासकी मिळवावी हे ध्येय. वाचनाच्या नादातून लिहिण्याचा छंद जडला. माझ्या कथा, कविता, लेख कॉलेज मॅग्झीनमध्ये व एकदोन नियतकालिकांतून प्रसिद्ध होऊ लागले. ह्या प्रसिद्धीच्या प्रयत्नात, एम्. ए. होण्याच्या प्रयत्नात मी जगाला जणू विसरलो होतो.

नाही म्हणायला दोन मुलींनी माझ्या जीवनात डोकावून बघण्याचा प्रयत्न केला होता. सुलभा आणि मीना. पण वेडाचार करायला माझं मन बिनकामी नव्हतं. माझं ध्येय अन् आदर्श यांनी एक अदृश्य भिंत तयार केली होती. ती ओलांडून जाणं मला जमलं नाही. पण...नशीब एखाद्याचं !

या मानसिक स्थितीतून सावरायला दोन दिवस लागले. हळूच सद्विवेकानं मान वर काढली. "पत्नीला सुखी करणं हे माझं कर्तव्य आहे." मन प्रफुल्लित झालं. शरिरात उत्साह संचरला. पण पत्नीसुख नशिबी नव्हतं. ऐनवेळी ती घटना आठवली अन्...स्त्रीबद्दलचा अनादर पुन्हा उफाळून आला.

आशा ! मूर्तिमंत सौंदर्याला साथ लाभली उत्साहाची ! अगदी प्रथम दिवसापासून तिचा जो उत्साह होता तो कायम होता. कमाल तिची. तिच्या सुखात कुठं कमतरता आहे, हे दुसऱ्याला कधीच जाणवणार नाही. ती माझं सारं काही मोठ्या प्रेमानं करू लागली. काही दिवसांपूर्वीची लेक्चरर आशा, माझ्या सुखासाठी धडपडत होती. बुटांना पॉलिश करण्यापासून तो टाय बांधून देण्यापर्यंतची कामं मोठ्या तत्परतेनं करी. सदा हसतमुख ... मी मात्र करपू लागलो, जळू लागलो. आपण लग्नच करायला नको होतं ... विचित्र प्रकारचा दोष शिरला होता...

नवविवाहित स्त्री-पुरुषांच्या रात्री पंख लावून उडतात. रात्र संपू नये असं वाटतं. पण माझं उलट झालं. रात्र येऊ नये असं वाटत होतं. कॉलेजमधून परतू नये असं वाटत होतं. जीवनात राम नव्हता. शिकविण्यात गोडी वाटत नव्हती. 'रुक्मिणीविरहवर्णन म्हणजे कवीची केवळ निरर्थक बडबड वाटत होती. इथं मिलनच नाही तर विरह समजावा कसा ? दिवस येत होते, जात होते. कंटाळ-

# माणूस
# रंगतरंग स्पर्धा

## स्पर्धा क्रमांक तीन

स्पर्धकाचे नाव आणि पत्ता

---

आतील दोन पानांवर एकूण आठ छायाचित्रे दिली आहेत. प्रत्येक छायाचित्राला चार शीर्षके दिली आहेत. पैकी एक शीर्षक बरोबर आहे. तीन चूक आहेत. तुम्हाला बरोबर वाटणाऱ्या शीर्षकाला तुम्ही शाईने स्पष्ट खूण करा.

छायाचित्र क्रमांक (१)

अ. म्हातारीचे केस
ब. दोऱ्यांचा गुंता
क. झाडाची फांदी
ड. कोळीष्टकाचा थोडासा भाग

छायाचित्र क्रमांक (२)

अ. गाल, ओठ, हनुवटी
ब. चंद्रावरील पृष्ठभाग
क. सहारातील एक दृष्य
ड. ज्वालामुखी

छायाचित्र क्रमांक (३)

अ. मोती
ब. पाण्याचे थेंब
क. रक्ताच्या पेशी
ड. वाळू

छायाचित्र क्रमांक (४)


अ होकायंत्र
ब. घड्याळ
क. वजन करण्याचा काटा
ड. कॅलेंडर




9




2




3











छायाचित्र क्रमांक (५)

अ. रस्त्यावरील दिवे
ब. टायरचा पृष्ठभाग
क. दारूच्या बाटल्या
ड. टोमॅटोंच्या रांगा

छायाचित्र क्रमांक (६)

अ. जुनी जीप गाडी
१९०२ सालातील
ब. फोर्डचे मॉडेल टी
क. खेळातील मोटार गाडी
ड. डॉज १९०८

छायाचित्र क्रमांक (७)

अ. दीपस्तंभ
ब. शिवकालीन नाण्यांची चवड
क. सर्किट ब्रेकर्सचा भाग
ड. स्प्रिंगज्चा भाग.

छायाचित्र क्रमांक (८)

अ. पुरुषाचा डोळा
ब. हरिणाचा डोळा
क. बालकाचा डोळा
ड. घोड्याचा डोळा

छायाचित्र क्रमांक १ व ८ यांना नवी शीर्षके सुचवा. शब्द-संख्या दहा ते पंधरा असावी.

---

शीर्षके

---

छायाचित्र १

---

छायाचित्र ८

---

माणूस साप्ताहिक : २ सप्टेंबर १९७२ : किंमत ५० पैसे
१०२५ सदाशिव पेठ, पुणे ३०. ५७३५९

वाण्या रात्रीदेखील न चुकता येत होत्या. मनाचा कोंडमारा संपत नव्हता.

अशीच एक रात्र. नऊ वाजले. नुकतंच जेवण झालं ... होय, जेवलो ... जगण्यासाठी. मी लवकर बाहेरून कधीच येत नसे. मी बैठकीत खुर्चीवर बसलो आहे. आशा स्वयंपाकघरातील काम संपवून बाहेर आली. पान लावू लागली. मी म्हटले, "आशू, एक गोष्ट सांगू ?"

"हंऽऽ!"

"माझं मन कसं विचित्र बघ. एकदा आईनं भलं मोठं वांगं भाजलं. मी ते पाहिलं. त्याचा देठ चिमटीत पकडला. त्याला वर उचलत म्हटलं, "अग आई, कसं कोंबडं हुरपळल्यागत दिसतंय बघ !" भाजलेलं कोंबडं मी एका पिक्चर-मध्ये पाहिलं होतं. झालं. मी त्या बैंगणाचं भरीत खाऊ शकलो नाही. फार कशाला, मी टरबूज खात नाही". मला पान देतांनी तिनं विचारलं,

"का ?"

"अग, ते दिसायला कसंतरी दिसतं...कसंतरी म्हणजे मांसासारखं."

"तुम्ही मांस खाता काय ?"

"नाही. पूर्वी महार लोक मेलेली गुरं कापत असत .. मी बघितलं एकदा !"

"ते टरबूज आहे, हे माहीत असून सुद्धा ..."

"होय. खाववत नाही. आता तूप न खाणारे काय कमी आहेत..."

'काहीतरी बाई, तुमचा स्वभाव' म्हणत ती अंथरुणं घालायला गेली. ती काही समजू शकली असेल काय ?

आणि ती घटना डोळ्यांसमोर तरळू लागली.

मॅट्रिकला होतो. भाऊ इंटर सायन्सला. परीक्षा जवळ आली. भाऊ मित्राकडे अभ्यास करायला जात असे. मी मात्र घरीच अभ्यास करी. घर भाड्याचं. स्वयंपाक करायला आजी होती. ह्या वाड्यात दोन भाडेकरू. एक आम्ही. दुसरा एक पोलिस.

दुपारची वेळ. मी वाचीत होतो.

"येशवंत !"

मी वर पाहिलं. तो आमच्या शेजाऱ्याची आंधळी मुलगी. तो विधूर होता. ती सत्तावीस अठ्ठाविस वर्षांची—अविवाहित.

"काय ?" मी विचारलं.

ती बोलली, "घरात साप की काय आहे ! मांजर फिस्कारतंय !"

"मग कुणा मोठ्या माणसाला बोलावलं पाहिजे !"—मी.

"छे. चूपचाप बघून घे. मग बोलाव..."

ठीक आहे. म्हणत मी तिच्या घरात शिरलो. अगदी माजघरात...साप नव्हता. मांजर नव्हती. समोर बघतो तर ती दारात उभी. हसत होती. मी बोलायच्या आत

तिनं माझा हात धरला.

"अग.. ए...काय हे?"

"चांगला मरदगडी...माझी विच्छा..." ती बोलली. ह्या अनपेक्षित प्रकारानं मी बावरलो होतो. काळीज धडधडत होतं.

आणि भावनावेगानं तिनं मला छातीला लावलं. माझा जीव गुदमरला. मी सुटण्यासाठी धडपडलो.

"तसं नाही सोडणार..."

"ठीक आहे", मी पुटपुटलो.

बघताबघता ती वस्त्रहीन झाली...तिचं लक्ष नाहीसं बघून मी धडपडत बाहेर पडलो. आणि तिचा तो अवतार. रागानं बुबळं फिरवत ती म्हणाली होती,

"षंढ मेला!"

या सगळ्या प्रकाराची मला शिसारी आलीय् आणि आता हटकून ही घटना आठवते. साऱ्या उत्साहावर पाणी पडतं. स्त्री म्हणजे वासनेची खाण...आशाचं चारित्र्य...

आता उपाय काय? तिच्या सुखासाठी मी तिच्यापासून दूर गेलं पाहिजे. तिच्या लायक वर शोधायला पाहिजे.

आणखी ५–६ दिवस गेले. मी निश्चय केला, की तिचं लग्न सुधाकरशी लावावं. माझा परममित्र. विधूर. माझ्याच वयाचा. श्रीमंत. गेल्या तीन वर्षांपासून वकिली करत आहे...नाही तरी मी तिला सुख देऊ शकत नाही.

एक रात्री मी तिला विचारलं, "आशू, सुधाकर कसा काय वाटतो तुला?"

"म्हणजे?"

"तरुण, उमदा, खेळकर!"

"असेल! त्याचा काय संबंध?"

'आशू, तू हिरा म्हणून मला जवळ केलंस पण मी गारगोटी निघालो...' माझा कंठ रुद्ध झाला होता, 'मी तुझं त्याच्याशी लग्न लावणार आहे...'

"काय?" ती किंचाळली. माझं अनपेक्षित बोलणं तिचं हृदय कापत गेलं. ओठ थरथरू लागले. भुवया वर चढल्या. समोरच्या खुर्चीवरून ती ताडकन् उठली. डोळ्यांतून माझ्याबद्दलचा तिरस्कार जाणवू लागला. गायीसारखी गरीब वाटणारी आशा आता वाघिणीसारखी गर्जली,

"काय बेशरम आहात हो? स्वतःच्या पत्नीचं लग्न परपुरुषाशी लावू इच्छिणाऱ्या पुरुषाला काय म्हणावं? मी काय बाहुली आहे? कधी तुमच्याकडे तर कधी...विवाहाची पवित्र बंधनं इतक्या आततायीपणं तोडता काय?...कसला षंढ नवरा मिळालाय् कुणाला ठावूक.."

षंढ! माझ्या मनातली संशयनागीण विसावली होती. अलिकडे मीच अकार्य-

क्षम आहे असं वाटू लागलं होतं. तिची मला कीव येत होती. माझी भावना तिनं जाणली नाही. संशयनागीण फूत्कारली, "चूप! मला षंढ म्हणतेस? ही मानसिक विकृती तुझ्यामुळेच..."

"मी? मी काय केलं?" तिनंही ओरडत विचारलं.

संशयनागीण गरळ ओकली, "होय! तूच कारण आहेस, मला तुझी शिसारी आलीय्...तुझं चारित्र्य...मला माहित आहे, की तू अनेक नाटकांतून कामं केलीस. सदोदित पुरुषांत वावरलीस. एक तरुण स्त्री आजच्या जगात पुरुषांमध्ये वावरते – मुक्तपणे, – सत्शील राहू शकते असं समजणारा मूर्खच असला पाहिजे. तुझी अनेक लफडी असली पाहिजेत. माझ्या दुर्दैवाला तूच कारण आहेस. तुझ्यासारखी सुंदर स्त्री सहज मिळाल्यावर..."

"अरे देवा...बस करा ते बोलणं...' मला ऐकायला नको," कानावर हात ठेवत ती म्हणाली. तिच्या रागाचे पर्यवसान अश्रू ढाळण्यात झाले, "काय हा संशय. मी बदचालीची असते तर तुमच्या घरी राहिले नसते...माझ्यामुळे तुम्ही दुःखी झालात तर मला गेलंच पाहिजे!" म्हणत ती उठली. बेडरूमचा दरवाजा धाडकन् बंद झाला.

"मला गेलंच पाहिजे." हे शब्द माझ्या डोक्यात घण घातल्यासारखे वाटले. म्हणजे काय करणार? जीव देणार! माझ्या हृदयाचं पाणी झालं, "आशूऽऽ! ए ... मला माफ कर..!" आतून फक्त हुंदक्यांचा आवाज येत होता.

आरामखुर्चीवर मी बसलो आहे, बंद दरवाजाकडे लक्ष आहे; केव्हातरी उघडेल या अपेक्षेनं जागत आहे...रात्री केव्हातरी डोळा लागला.

"यशवंत, ए यशवंत, घराचं दार उघडं ठेऊन तुम्ही झोपता की काय?" या वाक्यानं मी जागा झालो. चांगलंच उजाडलंय. समोर सुधाकर उभा होता.

"अरे, तू आत कसा आलास?" मी आश्चर्यानं विचारलं.

"कसा म्हणजे? पायानं चालत..." सुधाकर,

"अरे यार, मजाक मत करो...दरवाजा तर बंद होता!"

"छे, उघडाच तर होता! अन् तू खुर्चीवर कसा झोपला होतास? झगडा–बिगडा तर नाही केला वहिनीबरोबर.. ?"

दोघांचीही नजर बेडरूमकडे गेली. दरवाजा उघडा. "वहिनी, अहो वहिनी," सुधाकरनं आवाज दिला. टेबलावर माझ्या नावाची चिठी सांपडलीय्. वाचताच माझ्यावर आकाश कोसळलं...आशा मला सोडून गेली.

मी वाचू लागलो, "मला अनाथ करणाऱ्या माझ्या प्रिय नाथास; केवळ कल्पनांच्या आधारे आपण माझ्यावर घाणेरडे आरोप करीत आहात. निव्वळ कल्पनांचा खेळ. काय पुरावा आहे आपल्याकडे माझ्या गैरवर्तनाचा? मी नाटकात कामं केली, भाषणं केली, यावरून मी बदफैली आहे असा अर्थ कसा काय निघतो?

तुम्हा पुरुषांचे मेंदू हजारो वर्षांपासून सडलेले आहेत. जिथं तिथं स्त्रीबद्दल विनबुडाचा संशय घेता. तुमच्या कर्तव्याला सारं जग मोकळं अन् स्त्रियांनी मात्र चूल नि मूल या संकुचित क्षेत्रातच मरावं ! आपण विसाव्या शतकात राहात आहात. आज स्त्री कुठल्याच क्षेत्रात पुरुषांपेक्षा मागे नाही. नैतिक बाजू सांभाळण्यात, जुने संस्कार जोपासण्यात स्त्रीला जोड नाही.

लक्षात ठेवा, मी गैर वागणारी असते तर मी केव्हाच पसार झाले असते. पतीच्या प्रत्येक अडचणीत स्त्रीनं सहभागी झालं पाहिजे. तुमची अडचण मी समजले होते. विचार न करता योगायोगानं जुळलेला संसार उधळायला मी काही मूर्ख नाही ! ५० टक्के दु:खं माणसाच्या कल्पनेतूनच जन्म पावतात. कल्पनांच्या भोवऱ्यात सापडून माणूस आत्मघात करतो. वास्तववादी जीवन जगणं हाच त्याला उपाय.

सकाळी ४ च्या रेल्वेनं मी माहेरी जात आहे. मन स्वस्थ झाल्याशिवाय, संदेह गेल्याशिवाय आपण न्यायला येऊ नये."

"अमरावतीला गेली !" मी सुटकेचा निश्वास सोडला.

"अरे झालं काय ?...मी रोज सकाळी फिरायला जात असतो, हे तुला माहीत आहे. योगायोगानं मी आज या बाजूला फिरायला आलो. दार उघडं दिसलं म्हणून...काय झालं भांडायला ? लेका, एक महिना झाला नाही लग्नाला..."

मी माझी दुर्दैवी कहाणी सांगितली. न सांगून कसं चालेल. वर्तमान दुष्ट परिस्थितीमधून निघण्याची धडपड केली पाहिजे. माझं सांगून झालं. तो ताडकन् उठला अन् चालायला लागला. "एऽऽ, अरे चाललास एकदम ?"

"होय. माझ्यावरून भांडलात. संसार मोडायची वेळ आली. आता मलाच मार्ग शोधला पाहिजे. काहीही कल्पना करतोस. तुला माहीत असायला हवं, की आपण आपल्याबद्दल जशा कल्पना करतो, तसंच आपलं मन बनतं अन् मनाच्या चाकोरीतूनच शरीराची चाकं फिरतात. स्त्रीबाबतची नावड ही देखील कल्पनाच ! मी रात्री आठला येतो."

"कशाला ?"

"औषध आणतो !"

"कसलं औषध ?"

"ती उठाठेव कशाला ?"

सकाळच्या गोंधळातून सावरलो नाही, तोच सुधाकरनं आणखी भर घातली. रात्री आला तो एका खाणावळवाल्या बाईला घेऊन. म्हणतो कसा, "वहिनीच्या अभावी तुझी गैरसोय होत्येय्—स्वयंपाक करण्याचा तुला त्रास नको."

ती बाई स्वयंपाक करीत होती. सुधाकरनं एका पिशवीतून विदेशी दारूची बॉटल काढली व डोळे मिचकावत म्हणाला, "तुझ्या आजाराला बाई, बाटली हेच औषध आहे !"

" काय ऽ ऽ ?" मी किंचाळलो. " काय समजतोस मला !"

तो शांतपणे म्हणला, " मानसिक विकृतीनं त्रस्त झालेला रोगी !"

" हरामखोर, चल नीघ जा...सगळे जा."

" ठीक आहे, तुझ्यासाठी मी या मार्गाकडे वळलो. आशासारखं रत्न गमावून बसशील..."

माझ्या रागाचा पारा खाली आला, " सुधाकर, माझा आदर्श... मी प्राध्यापक आहे, समाजातील प्रतिष्ठा..."

" प्राध्यापकाला मार गोळी ! प्रतिष्ठा–पुन्हा कल्पनांचा आश्रय घेतलास. तू घरी एक पती आहेस, प्राध्यापक नाही, ज्या समाजाला तू भितोस, तोच समाज उद्या तुझी टिंगल करील. एकटया वहिनीनं जे म्हटलं ते हजारोंच्या मुखातून बाहेर पडेल !"

दुबळ्या माणसाचे आदर्श पाचोळ्यासारखे. माझं मन दुबळं नसतं तर ही वेळ आलीच नसती. मी ग्लासात ओतलेलं मद्य प्यालो. एक घोट...दोन...अर्धा कप, घसा जाळत पोटात गेलं.

जेवण झालं. कसातरी जेवलो. सुधाकर निघालासुद्धा. मी अडखळत म्हटलं, " अरे ती...!"

तो तुटकपणे बोलला, " पुन्हा पुन्हा सांगायला लावू नकोस."

मी अजिजीनं म्हटलं, " सुधाकर, मी दारू प्यालो. पण हे पाप..."

" कसलं पाप ? पुन्हा कल्पना...वेड्या; जगात पापपुण्य नाहीच. आहेत त्या कल्पना–परिस्थितीसापेक्ष." असं म्हणत तो बाहेर पडला. बाहेरून दाराला कडी घालायला मात्र विसरला नाही.

मद्यानं आपलं काम केलं. मला बसवत नव्हतं. बेडरूममध्ये जाऊन झोपलो. विचारचक्र थांबलं होतं...याचवेळी ती पायथ्याशी येऊन बसली. खाणावळवाली ! अगदीच सामान्य...न सांगता पाय चेपू लागली.

सारं काही विस्मृतीच्या पडद्याआड जात होतं. फक्त जाणवू लागलं, की ती स्त्री आहे अन् मी पुरुष......

सुधाकर पुन्हा मला भेटायला आला नाही. ती मात्र दररोज नियमानं येत होती. मद्य केव्हाच संपलं होतं आणि तरीही......

आशा गेली तेव्हापासून सातव्याच दिवशी मी अमरावती गाठली. आशा भेटली. किती वर्षांनी भेटत आहोत असं वाटत होतं.

माझ्या सुखी संसाराच्या इमारतीला ती खाणावळवाली पायाचा दगड बनली. अन् सुधाकर शिल्पकार ! या दोघांचे उपकार या जन्मी तरी फेडता येणे शक्य नाही.

□ □ □

Beyond Friendship

# मागास विद्यार्थ्यांची पाहणी

वि. भा. देशपांडे

सांगली-पुणे रातराणीने प्रवास करीत होतो. शेजारी एक तरुण गृहस्थ होते. अनेक विषयांवर गप्पा झाल्या. मी त्यांना आडनाव विचारले ते म्हणाले ' कांबळे '! प्रवास पुढे सुरू झाला. काहीवेळाने ते गृहस्थ आपणहूनच म्हणाले, ' माझे आडनाव ऐकून तुम्हाला वाटले असेल, की मी हरिजन किंवा तत्सम जातीतील आहे! पण मी ब्राह्मण आहे.' आणि हे आडनाव ब्राह्मणात कसे आले त्याचा थोडक्यात त्यांनी इतिहासही सांगितला. वास्तविक मी जातीसंबंधी त्यांना काहीही विचारले नसताना त्यांनी खुलासा का करावा, हा प्रश्न मला अस्वस्थ करीत होता.

त्या अस्वस्थ प्रश्नाचे व्यापक उत्तर Beyond Friendship च्या नव्या अंकाने दिले. हे एक षाण्मासिक आहे. विद्यार्थीजीवनाशी संबंधीत अशा लोकांना परिचित असे! त्या मासिकाचा यावेळचा अंक लक्षवेधी आहे. जाती-जमातींच्या दृष्टीने जे मागास विद्यार्थी आहेत, त्यांच्या प्रश्नांचा मागोवा घेण्याचा, त्यांचे मन समजाऊन घेण्याचा एक प्रामाणिक प्रयत्न केला आहे. या अंकाचे स्वागत अशासाठी केले पाहिजे की तो सारा अंक या एकाच गोष्टीच्या शोधार्थ आहे. जाताजाता एखादा लेख किंवा चर्चा केली आहे, असे स्वरूप नाही.

मागास विद्यार्थ्यांचे शैक्षणिक जीवन समजावून घेण्यासाठी मासिकाच्या संपादकांनी एक प्रश्नावली तयार केली. त्या प्रश्नावलीची उत्तरे निरनिराळ्या गावाच्या, शहराच्या विद्यार्थ्यांकडून, प्राध्यापकांकडून आणि त्याचा जिव्हाळ्याने विचार करणाऱ्या संबंधितांकडून मागवली. त्याचे एकत्रीकरण केले. त्यातले निवडक, विचारप्रवण असे आपल्यासमोर मांडले. प्रश्नावलीत एकूण चौदा प्रश्न आहेत. त्यापैकी महत्त्वाचे प्रश्न म्हणजे,

१ : शिक्षण घेत असताना वरिष्ठ जातीच्या विद्यार्थ्यांनी आपल्याला दिलेल्या

वागणुकीसंबंधी आपले अनुभव काय आहेत ? लहानपणी व नंतर शिक्षण घेतल्यावर किंवा घेत असताना वरिष्ठ जातींकडून मिळालेल्या वागणुकीत फरक असतो का ?

२ : विद्यार्थी मागास वर्गाचा आहे, हे समजल्यावर कॉलेजमधील वरिष्ठ वर्गाच्या विद्यार्थ्यांची त्यांच्याबाबतची वृत्ती बदलते का ? प्राचार्य-प्राध्यापक यांची तुमच्याबद्दलची वागणूक कशी आहे ?

३ : वरिष्ठ वर्गातील विद्यार्थ्यांचे तुमच्याबद्दल कोणते आक्षेप आहेत ?

४ : मागास विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या स्कॉलरशिप्स व फ्रीशिप्सच्या सवलतींबद्दल तुमचे काय मत आहे ? अशा सवलतींचा गैरफायदा घेतला जातो का ?

५ : कॉलेजात नेमक्या कोणत्या अडचणी येतात ? अभ्यासातले कोणते विषय अवघड वाटतात ? इंग्रजी शिक्षण, इंग्रजी माध्यम, इतिहास, विज्ञान शिक्षण विषयक मत काय आहे ?

६ : कॉलेजमध्ये स्नेह जमण्यात जात आड येते का ? वसतीगृहातील अनुभव काय ? इतरांचे जीवन पाहून सुखी जीवनासंबंधीच्या कल्पना काय झाल्या आहेत ?

७ : पदवी घेतल्यावर तुमच्या आचार विचारात, संस्कृतीत फरक पडतो का ? तुमच्या जातीच्या त्यावर प्रतिक्रिया कोणत्या ? जमातीत सुधारणा घडवून आणताना अडचणी कोणत्या येतात ? तुम्ही पदवीनंतर जमातीसाठी काय करता ? त्यांच्या अपेक्षा काय असतात ?

८ : समाजसुधारक म्हणून लोकहितवादी, आगरकर, म. फुले, लो. टिळक, वि. रा. शिंदे, शाहूमहाराज, सावरकर, आंबेडकर यांच्या कार्याविषयी तुमची काय मते आहेत ? निरनिराळ्या राजकीय पक्षांविषयी तुमची काय मते आहेत ? तुम्ही कोणत्या पक्षास मत द्याल ? त्यात जातीचा विचार किती असेल ?

असे काही महत्त्वाचे प्रश्न विचारले गेले. त्याची अनेकांनी उत्तरे दिली. अर्थात ती प्रातिनिधिक म्हणून गृहीत धरायला हवीत. सर्वांनाच सर्व प्रश्नांना सविस्तर आणि समतोल उत्तरे देता आली आहेत, असे नाही. पण जी उत्तरे आली आहेत, ती प्रामाणिक आहेत. आपल्याला अंतर्मुख करणारी आहेत. त्या उत्तरांमध्ये काहींचा आवर्जून उल्लेख करावयास हवा. अनेकांच्या उत्तरात एक गोष्ट प्रकर्षाने लिहिली गेली आहे, ती म्हणजे शाळेमध्ये असताना विद्यार्थ्यांत जितका जातीजातीत फरक केला जातो, तितका कॉलेजमध्ये केला जात नाही. शहरापेक्षा खेड्यात शाळेतला जातीतील फरक जास्तच जाणवतो. तिथला जातीतील फरक अस्वस्थ करणारा असतो. कॉलेजमध्ये वातावरणातील मोकळेपण अधिक जाणवतो. पण काहीवेळा विद्यार्थी मागास वर्गाचा आहे, हे कळल्यावर वरिष्ठ वर्गातील मुलांची वागणूक बदलते, असाही काहींनी उल्लेख केला आहे. 'आपल्या कॉलेजमध्ये सरकारच्या जावयांची संख्या किती ?' असे विचारले जाते.

विद्यार्थी जीवनात खेळाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. त्या खेळातही जातीयता

दिसते. नावामुळे, जातीमुळे काहींची निवड न झाल्याचे त्यांनी लिहिले आहे. आडनाव कळल्यावर मैत्रीमध्ये बदल (वाईट अर्थाने) झाल्याचेही काहीजण सांगतात. नाव कळल्यावर किंवा जात कळल्यावर घरी नेण्यास वरिष्ठ जातीतील विद्यार्थी तयार होत नाही. मैत्री फक्त कॉलेजमध्ये—तेवढ्यापुरतीच! प्राध्यापक आणि प्राचार्यांच्या वागणुकीत जातींचा संबंध येत नाही, असे बहुतेकांनी लिहिले आहे. तितकेच शाळेतील शिक्षकांचे कडवट अनुभवही तळतळून सांगितले आहेत. पण काही विद्यार्थ्यांनी असेही म्हटले आहे, की कॉलेजमधील मैत्री ही जातीतील फरकांपेक्षा गरिबी आणि आपसातील हेवेदावे यांच्यामुळे संपुष्टात येते.

स्कॉलरशिप्स आणि फ्रीशिप्स याबद्दलचा विचार अनेकांनी केलेला आहे. कारण याच कारणांवरून या मागास विद्यार्थ्यांना सरकारचे जावई म्हटले जाते. या आर्थिक सवलतीची आवश्यकता सर्वांनाच वाटते. अर्थात प्रत्येकजण त्याकडे वेगवेगळ्या दृष्टीने पाहतो. त्यासंबंधी राजाक्का संतराम माने या मुलीने लिहिले आहे 'जे मागास विद्यार्थी हुशार असून ज्यांची परिस्थिती गरिबीची असेल त्यांनाच सवलती मिळाव्यात. मागास असून श्रीमंत असेल व हुशार नसेल तर सवलत मिळू नये.' इतका अलिप्त विचार एखादी विद्यार्थिनी करू शकते. मागास विद्यार्थ्यांच्या सवलती हा हक्क होऊ पाहतोय, याचीही जाणीव अनेकांना आहे. असाच एक वेगळा विचार अनंत घोडे यांनी मांडला आहे. ते म्हणतात 'फक्त हरिजन विद्यार्थीच गरीब असतात असे नाही, तर वरिष्ठ जमातीतील बहुसंख्य विद्यार्थी गरीब असतात. त्यामुळे या खास सवलती फक्त हरिजन वर्गालाच मिळणे मला योग्य वाटत नाही. त्यापेक्षा अल्प उत्पन्नवाल्यांना मोफत महाविद्यालयीन शिक्षण दिले तर मी अधिक पसंत करीन.'

इंग्रजी शिक्षणाविषयीच्या आवश्यकतेविषयी कोणाचाच विरोध नाही. पण इंग्रजी शिक्षण आणि माध्यम याचा विचार नव्याने व्हावा, असे काहींनी म्हटले आहे. इंग्रजी चांगले येण्याचा आणि जातीचा काहीही संबंध नाही, अशी स्पष्ट कबुलीही दिली आहे. पण त्याचबरोबर आमच्या घरात शिक्षणाचे वातावरण नाही, सर्वांना तितकी आस्था नाही, त्यामुळे विषयांच्या समजुतीला काही अडचणी येतात. काही जाती-जमातीत तसे वातावरणच नाही, ही खंतही व्यक्त झाली आहे. वरिष्ठ जातीतील विद्यार्थ्यांची राहणी पाहून आपलेही जीवन त्यांच्यासारखे असावे, असे कित्येकांना वाटते. पारंपारिक, अशिक्षित वातावरणातून दूर होण्याची इच्छा सर्वांनाच आहे. राजकीय पक्षांबाबत बहुतेकांचा कल इंदिरावादी काँग्रेसकडेच आहे. इतर पक्षांबाबत फारशी उत्सुकता नाही. सामाजिक कार्य करणाऱ्या व्यक्तींबाबत जो प्रश्न होता, त्यात प्रत्येकाने त्या व्यक्तीच्या कार्याचा अर्थ आपल्या बुद्धिनुसार लावला आहे. त्यात संगती अशी नाही. त्या गोष्टीचा त्यांनी फार विचार केला आहे, असे दिसत नाही. मूळ प्रश्नांना मिळालेल्या उत्तरांचा हा थोडक्यात गोष-

वारा. त्यावरून थोडीफार कल्पना येऊ शकेल. खरे तर ही उत्तरे मुळातच वाचणे महत्त्वाचे.

प्रश्नोत्तरांच्या जोडीला या अंकात काही मान्यवर व्यक्तींचे लेख आहेत. त्यातील बऱ्याच व्यक्ती मागास विद्यार्थीजीवनाच्या प्रश्नांशी निकटवर्तीय आहेत. त्या लेखांची संख्या पंधरा-सोळा आहे. त्यामध्ये मला जे विचार महत्त्वाचे वाटले, त्यांचा थोडक्यात निर्देश करीत आहे. समाजकल्याण खात्याचे उपसंचालक श्री. मा. बा. कन्हेरकर यांनी शासनाच्यावतीने मागास जाती-जमातीतील विद्यार्थ्यांना कोणकोणत्या आर्थिक सवलती दिल्या जातात, त्याचे चित्र तपशिलात स्पष्ट केले. सवलतयोजनांची भूमिका आणि परिचय त्यामध्ये आहे. अर्थात त्यात आकडेवारीचा भाग आहे. पण त्यावरून सवलतीची कल्पना येऊ शकते. पंढरपूरच्या गौतम विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री. दत्ता सावळे यांनी मागास विद्यार्थी वसतिगृहाचे एक बोलके चित्र आपल्यापुढे निर्माण करून आपल्याला अवाक् केले आहे. ते सांगतात, '...आणखी एक वसतिगृह. अधिक्षक नाही; मुले रिकामी त्यामुळे बंडखोर. चालक-मुले नेहमीचा संघर्ष. संघर्षाचे मूळ कारण भूक. भूक भागत नाही; मुलांच्या तक्रारी–मागण्या–भाकऱ्या जाड करा. आमटी गरम असावी. सकाळी उसळ द्यावी. चालकांना या साऱ्या मागण्या मान्य नसतात. 'प्रवेश देणगी पन्नास रुपये प्रत्येकी द्या, मग देतो उसळ'–एक तडजोडीचा पर्याय. हे ऐकून मुले शरमिंदी होतात. उसळीची मागणी सोडून दिली जाते. मोबदल्यात चालक स्वयंपाक्याला जाड भाकऱ्या करण्याविषयी बजावतात. दोन दिवस शांतता. दोन दिवसांनी भाकरीचा उंडा पहिल्याएवढा. भाकरीची जाडी पहिल्याएवढी. पुन्हा शांतताभंग. मुले स्वयंपाक्यावर चिडतात. काहीसा घेरावसारखा प्रकार. स्वयंपाकी रडकुंडीस येतो. म्हणतो 'माझे काय जाते जाड भाकरी करायला ? मला पीठ मोजून देतात व तेवढ्यात भागवा म्हणतात.' मग मुलांचा मोर्चा चालकांच्या दारात. चालक गरजतात. त्यांना स्वयंपाक्याच्या हरामखोरीचा राग आलेला असतो. मुलांशी गोड बोलतात. स्वयंपाक्याला शिव्या देतात. म्हणतात, 'त्याला जाड भाकरी करायला सांगूनही करीत नाही. भडवा भाकरी चोरत असेल. तुम्ही लक्ष ठेवा.' मुले गुपचूप परततात. सावळ्यांनी दुसऱ्या एका वसतिगृहाचे जे वर्णन केले आहे, त्यामध्ये एक 'माताजी' आहेत. ती एक विलक्षण गोष्ट आहे. त्या 'माताजीं'च्या दर्शनार्थ खुद्द त्यांच्या वसतिगृहातच राहावयास पाहिजे. त्याविना प्रत्यत्य येणे कठीण ! इतके भयाण स्वरूप या मागास विद्यार्थ्यांच्या वसतिगृहाचे आहे. ते ऐकूनही आपण अस्वस्थ होतो, अवाक् होतो. प्रत्यक्ष राहणारा विद्यार्थी किती निबर कातडीचा आणि (भुकेच्या दृष्टीने) निबर पोटाचा असेल ? सोलापूरच्या संगमेश्वर कॉलेजमधील प्रा. वेन्नूर यांनी विमुक्त-भटक्या जातीविषयी खूपच महत्त्वाची माहिती सांगितली आहे. भटक्या-निमभटक्या जातींमध्ये कैकाडी, पामलोर, वेस्तर, छप्परबंद, गोंधळी वगैरे अनेकांबद्दल त्यांनी लिहिले आहे. त्यांची

स्वत:ला आधुनिक म्हणवून घेणाऱ्या
प्रत्येकाने संग्रही ठेवावीत
अशी नवी प्रकाशने

कॉन्टिनेन्टल

**सिग्मंड फ्रॉईड** : प्रा. ल. ब. हरोलीकर

मनोविश्लेषणशास्त्राचा पाया घालणाऱ्या
वैज्ञानिकाच्या जीवन-कार्याचा
रोमहर्षक परिचय (किंमत सतरा रुपये)

**टेलिव्हिजनचे अंतरंग** : प्रकाश दोशी

महाराष्ट्राच्या उंबरठ्यावर येऊन ठेपलेल्या
एका क्रांतिकारक यंत्र-यंत्रणेचा
थोडक्यांत परंतु शास्त्रशुद्ध परिचय
(किंमत फक्त सहा रुपये)

कॉन्टिनेन्टल प्रकाशन, विजया नगर कॉलनी, पुणे ३०

आजची शैक्षणिक सामाजिक स्थिती सांगतासांगता त्यांना मिळणाऱ्या सवलती-बद्दलही कथन केले आहे. त्यात विचित्र कोंडीत सापडलेल्या छप्परबंद जातीतील विद्यार्थ्यांची अवस्था केविलवाणी झाली आहे. त्यांना E. B. C. खेरीज अन्य सवलत मिळत नाही. ते मुसलमान असल्याने शासन त्यांची गणना अनुसूचित जातीत करीत नाही. त्यांची गणना विमोचित जातीत करते. पण विमुक्त जमातीच्या सवलती प्रगतावस्थेतील मुसलमान म्हणून त्यांना दिल्या जात नाहीत. म्हणजे दोन्ही बाजूंनी त्यांची कोंडी शासनच करीत असते. मुंबईचे प्रा. केशव मेश्राम म्हणतात, की शिक्षणाच्या क्षेत्रात विद्यार्थ्यांच्या जातींचा उल्लेख वारंवार होतो. क्वचित् प्राध्यापकांमध्येही होतो. शिक्षकांकडून अपमानास्पद वागणूक मिळते. विद्यार्थ्याचे कौतुक करताना 'अमक्या वर्गाचा असूनही' यश मिळविले, असा उल्लेख होतो. हा मागास विद्यार्थी संघटित होत आहे. 'नकाराचे आणि प्रतिकाराचे' नवे तत्त्व-ज्ञान निर्माण करू इच्छित आहे. तसेच आशादायी चित्र प्रा. रायमाने यांनी रंगवले आहे. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे बौद्ध विद्यार्थी अधिक सुजाण होत चालला आहे. त्याच्यामध्ये नव्या युगाचे मानकरी होत असल्याची, विज्ञानयुगात आपण अत्या-धुनिक बनावे, अशी जाणीव होत चालली आहे. श्री. शंकरराव खरात यांनी आपल्या लेखात दलित विद्यार्थ्यांची वर्तमान स्थिती वर्णन करून एक मागणी केली आहे; प्रतिगामी जातीय मनोवृत्तींच्या संकटातून दलित विद्यार्थ्यांना वाचवायचे असेल तर दलित विद्यार्थ्यांसाठी 'स्वतंत्र विद्यापीठ' हवे. 'माणूस'चे संपादक श्री. माजगावकर यांनी आपल्या लेखात आश्रमशाळांप्रमाणे 'आश्रमनगरे' हवीत, अशी रास्त मागणी केली आहे. प्रा. काळदाते, प्रा. रा. भि. जोशी यांनी आपल्या विद्यार्थ्यांचे काही अनुभव सांगून मागास विद्यार्थ्यांचे चित्र अधिक स्पष्ट केले आहे.

या अंकातील विद्यार्थी-प्राध्यापक-समाजसेवक आणि इतरांचे विचार पाहिल्यावर काही काळ मन क्षुब्ध झाले. मागास विद्यार्थी किती भयंकर स्वरूपाचे जीवन जगत आहे, याची खूपशी कल्पना आली. त्यांचे शिक्षणापुरते का होईना, पण किती प्रश्न निरनिराळ्या तऱ्हेचे असू शकतात आहेत, याचे दर्शन घडले. त्या प्रश्नावर अनेकांनी अनेक उपाय सुचवले. त्यातले काही व्यवहार्यही आहेत. शक्य आहेत. पण पुन्हा एक प्रश्न शिल्लक राहतोच, की या मागास विद्यार्थ्यांना समाजात माणूस म्हणून मानाने केव्हा जगता येणार? नुसत्या सोयी-सवलतींनी भागणार नाही. तर या प्रकट विचारांना कृतिशीलतेची जोड हवी. अर्थात मी हे केवळ मंत्रीपद्धतीचे वांझोटे विधान करीत नाही. तर बाबा आमटयांसारख्या ऋषितुल्य समाजसेवकासारख्यांचे जे कार्य आहे, त्याचा विस्तार व्हायला हवा. त्यात आमच्यासारखी सामान्य माणसे कोणते कार्य करू शकतात, त्याचे मार्गदर्शन असायला हवे. मला वाटते Beyond Friendship च्या संपादकांच्या आणि कार्यकर्त्यांच्या मनात काही योजना असाव्यात असे दिसते. त्यांनी त्या दृष्टीने पुढले काही पाऊल उचलले तरच या विशेषअंकाची महत्ता वाढणार आहे! या प्रश्नांना तड लागणार आहे! ◻ ◻ ◻



# मी नेताजींना बघितलंय

लेखक : नारायण सान्याल

अनुवाद : अशोक शहाणे

पंचवीस वर्षं लोटली की ह्या सगळ्याला ! ,इतका बारीकसारीक तपशील माझ्या लक्षात रहाण्याजोगा नाही खरंतर, पण आहे लक्षात ! पहिलं कारण म्हंजे मला डायरी लिहायची सवय होती. अन् माझी डायरी सगळ्या धामधुमीतदेखील हरवली-बिरवली नाही. दुसरं म्हंजे डायरी-बियरी नसती तरीदेखील उण्यापुऱ्या सत्तेचाळीस वर्षांच्या माझ्या आयुष्यातले हे तेरा दिवस विसरणं मला शक्यच नव्हतं. त्या तेवीस एप्रिलपास्नं पाच मेपर्यंतचे दिवस—त्यांत हा एकच तेवढा दिवस नाझिरच्या सहवासात गेला.

दिवसभर आम्ही दोघं धावपळ करत होतो. शहराच्या ह्या टोकापास्न त्या टोकाला. नाझिर सायकलवरनं पोस्टात आला होता, त्या सायकलवरनं फिरत होतो आम्ही दोघं. मला त्यानं पुढच्या दांडीवर बसवलं होतं. बाजूनं त्याच्या हाताचा विळखा. आयुष्यात पहिल्यांदाच त्याच्या हातात सापडले होते ! तेच शेवटचे !

अन् तो हाताचा विळखापण लष्करी कामाकरता म्हणून. मला वेढून त्याचे दोन्ही हात सायकलचं हँडल धरून होते. आम्ही दोघंही वाग्दत्त होतो. आमच्या आणाभाका झालेल्या होत्या. पण आपलं लग्न स्वतंत्र भारतात व्हावं अशी दोघांचीही इच्छा होती. ब्रह्मदेशात लग्न करावंसं वाटत नव्हतं.

भारतवर्षापर्यंत मला काही पोचता आलं नाही. नाझिर भारतवर्षापर्यंत पोचला होता. पण मी बरोबर नव्हते. अन् मला घेऊन दुसऱ्यांदा काही त्याला भारताच्या भूमीवर पाऊल टाकता आलं नाही. नाझिर मरण पावला मौलमीनच्या इस्पितळात. पाच मे. अन् मी आजपण अविवाहित राह्यले.

बघा, परत आमच्या खाजगी गोष्टी आल्या ना ? तर मी काय सांगत होते—

दिवसभर धावाधाव करून सगळी व्यवस्था करून टाकली. रात्री आठ वाजता ट्रेन कुठनं सुटणार ते पण बघितलं,

दुपारी नाझिरनं मला एका खानदानी ब्रह्मी हॉटेलात नेलं. रॉयल लेकच्या शेजारचं हॉटेल. स्वेडॅगॉन पॅगोड्यांच्याजवळच.

बाहेर रस्त्यावर प्रचंड धांदल. लोक टोळक्या-टोळक्यांनी शहर सोडून जातायत. पेट्रोलची चणचण. त्यामुळं रस्त्यावर मोटारी अगदी कमी. टांगे, बैलगाड्या अन् हातगाड्या. पायी चालणारे सगळ्यात जास्ती. पेटचा-बोचकी काखेत मारून पोराबाळांचे हात धरून हजारो माणसं चाललेली उपनगरात. आता कोणत्याही क्षणी शत्रु शहरात प्रवेश करेल, अर्थात ब्रह्मदेशाला जपानी काय अन् ब्रिटिश काय,

दोघही सारखेच. पण हातबदलाच्या ह्या काळात सगळेच जरासे वैतागलेयत. एवढं होऊन जाईपर्यंत शहराच्या बाहेर राह्यलेलंच बरं

पण रस्त्यावर इतकी गडबड असली म्हणून काय झालं. कॅबेरे-रूममध्ये ह्याचा लवलेशपण नाही. तिथं टेबला-टेबलावर जपानी अन् ब्रह्मी लष्करी अधिकाऱ्यांची गर्दी. बऱ्याचजणांच्या बरोबर ब्रह्मी बायका. हाच धंदा त्यांचा. अन् उठत्रस मरणाशी गाठ असणाऱ्या लष्करी मंडळींना प्रत्येकच क्षण मोलाचा वाटत होता. सगळीच लष्करी माणसं क्षणिकवादी असतात म्हणा.

पोर्टिकोच्यासमोर नाझिर सायकलवरनं उतरला. मला म्हणाला--चल उतर.

—हे आपण कुठं आलो रे नाझिर ? इथं जेवायला काय पैसे घेतील काही पत्ता आहे तुला ?

नाझिर हसत म्हणाला--आहे ग. पण इलाजच नाही. इथं एका खास मेहमानाशी अपॉइंटमेंट ठरल्याय् आज माझी. अत्यंत महत्त्वाच्या गोष्टीबद्दल चर्चा करायच्यायत त्यांच्याशी.

नाइलाजानं त्याच्यामागोमाग मलापण जावं लागलं. कॅबेरे-रूमच्या बाजूनं आम्ही डायनिंग-हॉलमधे आलो. नाझिरनं काय काय एकेक ऑर्डर दिली वियरची पण. माझ्याकरता ऑरेंज स्क्वॅश.

मी विचारलं--तुझी अपॉइंटमेंट आहे ते कोण आहेत—जपानी का ब्रह्मी ?

नाझिर गंभीरपणानं म्हणाला—दोन्ही चूक ! भारतीय !

माझ्यामुळं काही गैरसोय नाही ना व्हायची तुमची ?

--छे छे ! मुळीच नाही. कारण ती मेहमान म्हंजे तूच आहेस ना !

काय पागल पोरगा आहे !

मी हसले.--मग इथं कशाला आलास ? सराईखाने काय कमी आहेत का ?

--नाही, आणखी आहेत ना ?--परत परत कपोळावर येणारे केस मागं सारतासारता नाझिर म्हणाला. मग एकदम माझ्याकडे झुकून खालच्या आवाजात म्हणाला--

फक्त तेरी सूरत देखने को आते है साकी
वरना पीने को तो मयखाने और भी है ।
पहले तो शेख ने आके देखा इधर उधर
फिर सर झुकाकर दाखिल-इ-मयखाना हो गये ।।

मी चाटच पडले. विचारलं—म्हंजे ?

--म्हंजे फार्सी नाही तर नाही पण उर्दू तरी तू शिकून घ्यायला पाहिजेस ! नाही तर माझी मंझिल आली तरी तिथं तुला जागा मिळायची नाही !

मी त्याला वेडावून दाखवलं.

—मग अडलंय् माझं तुझ्याशी वरदार थाटायला ! हिंदुस्तानी शिकताशिकताच

माझी जीभ तुटायला आल्याय्. उर्दू-बिर्दू आपल्याला ह्या जन्मी जमायचं नाही रे बाबा!

नाझिर हसून म्हणाला—अग इतकी गोड अन् इतकी सोपी भाषा दुसरी कोणती आहे?

मग माझा हात स्वतःकडे ओढून घेऊन परत म्हणाला—सकाळपास्नं सायकलवर बसल्याबसल्या तुझा हा प्रचंड खोपाच तेवढा बघतोय्. केसांना काही तेलबीळ लावत नाहीस तू?

मी हसले.

—तुला काय वाटलं, मी अभिसाराकरता बाहेर पडलेय् का? हे रणांगण आहे. इथं कुणी सुगंधी तेल वगैरे वापरत नाही—

—म्हणून तर तुला इथं घेऊन आलो. जरा समोरासमोर बसू या तरी, कलेजा फाडून टाकणारे मोहब्बतीचे शब्द बोलावेत म्हणून. फक्त तेरी सूरत देखने को आते है साकी—

लेफ्टनंट नाझिर अहमद सैनिक तर आहेच. पण तेवढ्यावरच काही त्याची ओळख झाली असं नाही. तो कवि आहे. आपल्याच तंद्रीत खुशीनं-उत्साहानं राहणारा प्राणी आहे तो. त्याचं हसणं म्हंजे दिलखुलास, सातमजली. त्याचं चालणं म्हंजे पळणं. पक्का ॲथलेट आहे. स्पोर्टसच्या वेळी ढीगभर कप्स अन् मेडल्स जिंकायचा. खरं सांगायचं तर तो सैनिकपण नाही, कवीपण नाही, खेळाडूपण नाही पुरता वेडा आहे वेडा!

एकदम ताडदिशी उठून उभा राह्यला.—बघ आता! विसरूनच चाललो होतो! तुझ्याकरता एक प्रचंड प्रेझेंट घेऊन आलोय्! थांब हं!

अन् नाझिर दोन्ही खिसे चाचपायला लागला. म्हंजे नक्कीच काहीतरी दागिना आणलेला दिसतोय्. काय वेडपट आहे पहा—आत्ता एवढ्यात काहीच दागिने आम्हाला घालता येणार नाहीत हे काय ठाऊक नाही का ह्याला?

सरतेशेवटी सबंध कागद गुंडाळलेलं काहीतरी त्यानं खिशातनं बाहेर काढलं.

—हे घे!

—काय ते?

—तूच उघडून बघ ना!

काळजीपूर्वक मी कागद सोडला. तरीपण रहस्य काही उलगडलं नाही. चिक्कणमातीचं एक ढेकूळ होतं आत!

—काय आहे हे?

काही न बोलता ते ढेकूळ माझ्या हातात दिलं नाझिरनं. मग म्हणाला—भारतवर्षाची माती!

नाही. माझं चुकलंच. नाझिर काही वेडा नाही! तो कवीच आहे! ब्रह्मदेशच्या

उत्तर सरहद्दीवर तो पोचला होता. त्यानं भारताच्या भूमीत प्रवेश केला होता. दागिना नाही, साडी नाही--आपल्या प्रेयसीकरता घेऊन आला होता चिकण-मातीचं एक ढेकूळ. भारतवर्षाची माती !

मला ठाऊक आहे, तुम्ही हसाल. हसणारच की. रोज लाथ मारता तुम्ही ह्या मातीला. मी मात्र त्या दिवशी मातीचं ते ढेकूळ हातात घेऊन गप्प बसले होते. माझ्या डोळ्यांत पाणी आलं होतं. अहमदनं गोष्ट ऐकवली होती. भारताच्या भूमीवर पहिल्यांदा पाऊल ठेवल्याची गोष्ट. गोष्ट नाही, सत्य घटना !

ब्रह्मदेशाची सरहद्द ओलंडून आझाद हिंद सेनेनं भारताच्या भूमीत पहिल्यांदा पाऊल ठेवलं होतं ते १९४४ साली. मार्च महिन्याच्या अठरा तारखेला. त्याच्यानंतर बरोब्बर तीन दिवसांनी म्हंजे एकवीस मार्चला नेताजींनी रेडिओवरनं ही गोष्ट जगजाहीर करून टाकली होती.

ही बातमी जेव्हा कालादान–इरावतीच्या खोऱ्यातल्या वेगवेगळ्या छावण्यांत पोचली तेव्हा आझादी सैनिकांच्यात काय उत्साहाचं वारं पसरलं होतं ! आनंदानं वेडे होऊन गेले होते सगळे ! अन्नपुरवठ्याची चणचण, कपडे फाटून गेलेले, जखमी न् आजारी सैनिकांना औषधपाणी मिळत नव्हतं--तरी ह्या बातमीनं सगळे आनंदानं नाचायला लागले. एकमेकांना मिठ्या मारायला लागले.

जपानी सेनापती यामामोतो न् आझाद हिंद सेनेचं केंद्रीय दप्तर ब्रह्मदेशातनं चामीलला आले, आसामात. तेव्हादेखील कर्नल चतर्जी चिंदुइन नदीच्या पूर्वेच्या तीरावर होते. जून महिन्यात ते बाकीच्या लोकांनिशी हेडक्वार्टर्सकडे रवाना झाले. हेडक्वार्टर्सकडे म्हंजे भारताच्या स्वतंत्र झालेल्या भागाकडे. नाझिर अहमद पण त्यांच्याबरोबर होता. कर्नल चतर्जी तेव्हा कर्नलच होते. अजून मेजर-जनरल झाले नव्हते.

भारताच्या ह्या मुक्त भागात जाण्यात त्यांचे दोन हेतू होते. एक म्हंजे सैन्याची अवस्था प्रत्यक्ष बघायची होती. दुसरं म्हंजे ह्या मुक्त भागात हंगामी सरकार स्थापन करायचं होतं.

ह्याच वेळी ह्या जिंकलेल्या भागात कुणाचा हुकूम चालावा ह्या मुद्द्यावरनं आझाद हिंद सेनेचे न् जपानी सैन्याचे खटके उडायला लागले होते. सरतेशेवटी नेताजींनी मध्यस्थी केली. जपानचे सरसेनापती जनरल तोजोंनी आदेश दिला. अन् हे भांडण मिटलं.

पण तरी आपण वेगवेगळ्या छावण्या डोळ्याखालनं घालाव्यात अन् मैत्रीची भावना परत एकदा प्रस्थापित करावी म्हणून कर्नल चतर्जी तिकडे निघाले होते.

भारताच्या भूमीत प्रवेश केल्यावर आझाद हिंद दलाच्या सेनापतींनी जपानी सेनापतीला असं कळवलं, की ज्याअर्थी 'मोरे'पास्नं ब्रह्मदेशाचा मुलूख संपून भारताच्या प्रदेशाला सुरुवात होतेय्, त्याअर्थी इथपासून पुढं ताब्यात येणाऱ्या

प्रदेशाची सगळी जबाबदारी आझाद हिंद सेना सांभाळेल. इतके दिवस जपानी न् आझादी सेना खांद्याला खांदा लावून आगेकूच करत आल्या होत्या. अन् जिंकलेल्या मुलखाचा सगळा लष्करी कारभार जपानी सेनापतीच्या हुकमानंच होत होता. आझाद हिंद सेनेच्या सेनापतींनी ह्याला काहीच हरकत घेतली नव्हती. कारण इतके दिवस ते ब्रह्मदेशाच्याच जमिनीवर होते.

पण यू नदी ओलांडून, टामू मागं टाकून ज्या क्षणी सैन्याची ही जोडगोळी 'मोरे'ला पोचली त्या क्षणीच आझादी कमांडर म्हणाले—आता इथपास्नं जे काही जपानी किंवा आझादी सैन्याच्या कब्ज्यात येईल, ते–ते आझाद हिंद सरकारच्या मालकीचं समजावं. जरूर पडली तर आझाद हिंद सेनेचे सेनापती ह्या मिळकतीचं वाटप जपानी सैनिकांच्यात पण करतील.

ही गोष्ट काही जपानी सेनापतींना मान्य झाली नाही. त्यांचं म्हणणं पडलं— अजून काही इंफाळ पडलेलं नाही. अन् इंफाळ जोपर्यंत पडत नाही तोपर्यंत लष्करी आणीबाणी कायम आहे असंच मानायला पाहिजे. तेव्हा अशा आणीबाणीच्या परिस्थितीत जपानी सैन्य काही जिंकलेल्या भागावरचा आपला ताबा सोडायला तयार नाही.

ह्याच्यावरनं दोन्ही पक्षांत चांगलं भांडण जुंपलं. प्रकरण कदाचित् हातघाईवर पण आलं असतं. पण आझाद हिंद सेनेच्या अधिकाऱ्यांनी सुचवून पाह्यलं की— ह्या भांडणाचा समेट आता तुम्हीच करा असा निरोप रेडिओ–टेलिफोनवरनं खुद्द नेताजी न् जपानी सेनापती यामामोतो अशा दोघांच्याकडेही पाठवू या. पण तिकडून काही खुलासा यायच्या आधीच जपानी सैनिकांनी आत्ताच मुक्त झालेल्या भारताच्या ह्या भागावर जर का जपानी झेंडा फडकवायचा प्रयत्न केला तर मात्र आझाद हिंद सेनेच्या सैनिकांना जपानी सैनिकांवर हल्ला चढवायचा हुकूम सोडणं आपल्याला भाग पडेल—असं पण ह्या अधिकाऱ्यांनी खंबीरपणानं सांगून ठेवलं.

जपानचा राष्ट्रध्वज भारताच्या भूमीवर फडकवायचं वेडं धाडस जपानी सेनापतींनी अर्थातच केलं नाही. अन् चोवीस तासांच्या आतच टोकिओहून जपानी सैन्याचे सरसेनापती न् प्रधानमंत्री जनरल तोजो ह्यांनी अशी घोषणा केली की—

An inch of land occupied either by Nippon or by I. N. A. on Indian soil, will be controlled by the Provisional Government of Free India.

असं झालं अन् कर्नल चतर्जीच्या तुकडीबरोबर लेफ्टनंट नाझिर अहमद पण उत्तरेकडे रवाना झाला.

नाझिर म्हणाला — तुला एवढं सांगतो आरती, तो दिवस मी आयुष्यांत विसरणार नाही. भारतवर्षांत पहिल्यांदा पाऊल ठेवायचा तो शुभ मुहूर्त !

एक जीप न् एक वेपन कॅरियर एवढंच घेऊन कालेवाहून पहाटे पाचला आम्ही



3 BROTHERS/MAR

निघालो. आम्ही पंधराजण होतो. कर्नल चतर्जी जीपमधे ड्रायव्हरच्या शेजारी होते. त्यांच्यामागं मी न् त्यांचा ऑर्डर्ली.

नऊच्या सुमाराला आम्ही होडीतनं चिंदुईन पार केली. बारा वाजता 'टांगा'. आमच्या दुपारच्या जेवणाची सोय करून ठेवलेलीच होती. कर्नल चतर्जी म्हणाले — तुम्ही मंडळी खाऊन घ्या नाझिर. बरोबर तासानं आपण परत निघू या.

—— पण तुम्हांलादेखील जेवायचंयच की. चला.

—— नाही. मला काही खायचं नाही.

—— तब्येत ठीक आहे ना सर ?

ते हसले.

——हो हो. अरे तू काळजी नको करूस. तब्येत ठणठणीत आहे.

—— ह्याच्यानंतर आता एकपण वस्ती लागायची नाही. सगळं दाट जंगल आहे नुस्तं. त्यामुळं टामूला पोचायच्या आधी काही म्हणता काही खायाला मिळायचं नाही. अन् टामूला पोचायलाच आपल्याला रात्र होईल. शिवाय आपण येणार म्हणून इथं आधीच कळवून ठेवलेलं होतं. जेवणबिवण तयारच आहे.

कर्नल चतर्जी किंचित् हसले न् म्हणाले —— मला काही तुला समजावून सांगणं जमायचं नाही नाझिर. आज उपास आहे माझा. एका व्रताचं उद्यापन आहे आज. यज्ञ पुरता व्हायच्या आधी आम्हाला जेवता येत नाही बाबा !

लगेच मी सॅल्यूट ठोकला. म्हणालो —— मग उगाच एक तास कशाला घालवायचा ! चला, आत्तांच निघू या.

—— म्हंजे ? तुम्ही खाऊन घेत नाही ?

आता मी पण हसलो.

—— आम्ही यज्ञ करत नसलो तरी रोजा करतो सर !

सगळ्यांचं जेवण तसंच पडून राह्यलं. ड्रायव्हर न् ऑर्डर्लीनंपण काही तोंडात घातलं नाही. जणू सगळ्यांचच व्रत होतं ! तुकडीचा नायक अभुक्त राह्यल्यावर कोण जेवणार !

आम्ही टामूला पोचलो तेव्हा सूर्य मावळायचा होता.

टामूतपण आम्ही येणार हे कळवलेलंच होतं. ते आमची वाटच बघत होते. आम्ही छावणीत पोचलो. तिथं कॅंप कमांडटनं कर्नल चतर्जींच्याकरता गार्ड-ऑफ-ऑनरची तयारी केलेली. पण कर्नल चतर्जी 'नंतर बघू' म्हणाले.

टामूपासनं यू नदी फक्त तीन मैलावर. यू नदीच्या पलिकडच्या तीरावर मारै गाव. ते भारतात मोडत होतं. आसाममधे.

कर्नलनी सांगितलं, आपल्याला छावणीत परतायला तासभर लागेल. त्यांना थांबायला सांगून आम्ही वायव्येला तोंड करून निघालो.

पाचच मिनिटात यू नदीच्या तीरावर आलो. तिथं एक पूल होता. त्या पुला-

वरनं गाडी पलिकडे न्यायची होती. पण आदल्याच दिवशी रात्री शत्रूच्या विमान-हल्ल्यानं पूल मोडकळीस आला होता. दुरुस्तीचं काम दिवसरात्र चाललं होतं.

कर्नल जीपमधनं खाली उतरले. ब्रिजच्या दुरुस्तीचं काम करणाऱ्या कंपनीचा ऑफिसर — इंजिनियरिंग कोरचा कॅप्टन — पुढं आला. त्यानं कर्नलला सॅल्यूट ठोकला — जयहिंद !

— जयहिंद ! कॅप्टन, नदीला पाणी किती आहे ?

— पुरुषभर काही नाही. गळ्यापर्यंत येईल.

कर्नल चतर्जींनी आणखी काहीच विचारलं नाही. त्यांनी आपले लष्करी कपडे उतरवायला सुरवात केली. टोपी, बूट, शर्ट, ब्रीचेस — सगळा लष्करी गणवेश त्यांनी उतरवून ठेवला. अन् ते पाण्यात उतरले. आम्हीपण कपडे उतरवून त्यांच्या-मागोमाग पाण्यात उतरलो.

सूर्य आता पश्चिमेच्या क्षितिजाला लागला होता. पाणी-चिखल तुडवत कर्नल चतर्जी पुढं चालले होते. त्यांच्या पाठीवर जानव्याची रेघ मोठी खुलून दिसत होती. दोन्ही हात जोडून कसलेतरी मंत्र म्हणत म्हणत ते चालले होते.

पाणी गळ्यापर्यंत आलं. कर्नलनी मुद्दामच डोकं बुडवलं स्नान करून व्रताचं उद्यापन करायचा काही नियम असतो वाटतं त्यांच्यात — हिंदूंच्यात.

पात्र पार करून कर्नल चतर्जी पलीकडे गेले. उजव्या हाताच्या आंगठ्याभोवती जानवं गुंडाळून घेऊन उदात्त आवाजांत काहीतरी संस्कृत मंत्र म्हणत-म्हणत त्यांनी पलिकडच्या चिखलानं भरलेल्या तीरावर चक्क लोटांगण घातलं ! बंधनातनं मुक्त झालेल्या मातेला साष्टांग दंडवत घातला ! वेड्यासारखं त्या चिखलाचा चंदना-सारखा कपाळावर टिळा लावला ! त्यांच्या दोन्ही डोळ्यातनं पाण्याच्या धारा लागल्या होत्या !

आम्हीपण पलिकडे जाऊन नमाज पढला.

दोघं शीख होते. त्यांनी ग्रंथसाहेबातले मंत्र म्हटले.

मग कर्नलनी आपल्या हातानं त्या ओल्या मातीचा टिळा आमच्या सगळ्यांच्या कपाळाला लावला. ती नरम ओली माती मी सबंध अंगाला माखली ! आपल्या देशाची माती !

ते दृश्य मी जन्मात विसरणार नाही !

बऱ्याच जणांनी ती माती बरोबरपण घेतली. जवळच्या माणसाला द्यायला म्हणून. मीपण घेऊन आलो तुझ्याकरता ! हीच ती माती !

—माती नाही, माँ—ती ! —मी म्हणाले.

पण नाझिर अहमदच्या वेडेपणाच्या गोष्टी राहू देत. ब्रह्मी हॉटेलच्या एअर-कंडिशन मंद उजेडाच्या डायनिंग हॉलमधे आम्ही दोघं वेडे जीव मातीच्या एका ढेकळावरनं गहिवरलो होतो. किंवा रणांगणाच्या निर्जनतेत ह्या वेड्या जीवांनी

एक स्वप्नाचं जाळं विणलं होतं--वगैरे गोष्टी काही ह्या कहाणीत बसत नाहीत. मेजर-जनरल ए. सी. चतर्जींचा म्हंजे मणिपूरच्या भावी गव्हर्नरांचा एडिकाँग आपल्या वाग्दत्त वधूच्या कानात काय बोलला होता--ह्या सगळ्याच गोष्टी निव्वळ खाजगी आहेत, नाही का? छोटचा लाटनं आपल्या प्रेयसीला दिलेलं ते पहिलं न् शेवटचं जेवण. अर्ध्या तासाची ती फुरसत--ती अक्षरश: माझी खाजगी मालमत्ता आहे.

शिवाय त्याचा सगळा वेडेपणा एक मी भले सहन करत होते, पण तुम्ही कशाला सहन कराल? त्याचं कवि असणं न् सैनिक असणं, त्यांची एकत्र खिचडी केली तर काय होईल? असा हा नाझिर अहमद! त्याच्याशी गंभीरपणानं काही बोलायची सोयच नव्हती. परिस्थिती कितीही गंभीर असली तरी तो सगळा भार हलका करायचा--खिलाडू वृत्तीनं किंवा मग कवीच्या वृत्तीने. त्याला काय कधी संसारात गुंतून पडता आलं असतं? रुपये-आणे-पैचा हिशेब महिन्याच्या महिन्याला धीर धरून करता आला असता? कोणजाणे! तेव्हा तरी माझा विश्वासच बसला नसता. सगळंच तो हलकं करून उडवून लावायचा आपल्या कवित्वानं. मला अजून आठवतंय्, बोलता--बोलता मी म्हणाले--ह्या लढाईत आपली हार झालीच तर ती निव्वळ पुढारलेली हत्यारं नाहीत म्हणूनच होईल.

हा विषय भयंकर वाईट. वेदना देणारा, दुखवणारा. त्या काळी ज्याच्या-ज्याच्याशी म्हणून बोलताना हा मुद्दा काढला होता, तो हे कबूल करायचा. त्याला वाईट वाटायचं. हाय-हाय, अरेरे असे अगतिक शब्द त्याच्या तोंडातनं बाहेर पडायचे.

पण नाझिर अहमद असल्या गोष्टींच्या जवळपासपण फिरकायचा नाही. तो म्हणाला--तू आहेस की बरोबर. आणखी हत्यारं काय करायचीत?

--म्हंजे? मी काय तुला शस्त्रंबिस्त्रं पुरवते का?

--एक्झॅक्टली. इंग्लंडच्याविरुद्ध लढायचं तर तलवार पाह्यजे. शत्रूला बांधून घालायचं तर साखळदंड पाह्यजे. पण कवी म्हणतो, तूच ती आर्मरी आहेस. युद्ध-सामग्रीचं भांडार!

ह्याचं बोलणं हे असंच! काही अर्थबोध होईल तर शपथ! म्हणून मग मी विचारलं--म्हंजे?

तर माझ्यासमोर हात नाचवत तो म्हणाला--

आँखें नही है--तीर है
अब्रु नही है--शमशेर है
जुल्फे नही है--जंजीर है।

सगळी व्यवस्था वगैरे करून मी बराकीत परतले तर तीन वाजत होते.

पहिल्यांदाच अम्माजी भेटल्या. मला बघितल्याबरोबर म्हणाल्या—झाली का सगळी व्यवस्था ?

मी दचकलेच,

विचारलं—कसली व्यवस्था ?

—आगगाडीची. कधी सुटणार गाडी ?

मी हादरलेच की चांगली.

म्हणाले—कोण म्हणलं मी गाडीची व्यवस्था करायला गेले होते म्हणून ?

माझ्या प्रश्नाचं उत्तरच न देता त्या म्हणाल्या—नव्हती गेलीस ?

मी काहीच उत्तर न देता सरळ बराकीत शिरले. तडक मिसेस थीबर्सकडे !

अन् लगेचच त्यांना विचारलं—आपण गाडीनं जाणार आहोत ते काय सगळ्यांनाच ठाऊक आहे ?

—नाही. का बरं ?

—चीफ-ऑफ-स्टाफनी तसं काहीच सांगितलं नाही ?

—नाही ग. पण तू का विचारतेय्स हे सगळं ?

मग नाइलाजच झाला. त्यांना सगळंच सांगावं लागलं. अम्माजींशी काय काय बोलणं झालं ते. थीबर्स गंभीर झाल्या.

आम्हाला तयार व्हायला काही फार वेळ लागला नाही. आपापली किटबॅग पाठीवर टाकून न् रायफल खांद्याला लटकवून संध्याकाळच्या आतच आम्ही रंगूनच्या रेल्वे स्टेशनपास्नं एका मैलावर असलेल्या त्या सायडिंगला गेलो. रिकामे बारा डबे एकमेकाला जोडून उभे होते. इंजिन लागलं की गाडी सुटणार. सबंध तुकडी सामानासकट गाडीत शिरली. सगळ्यांनी बसून घेतलं. अर्थात् काही जणींना खाली कांबळे अंथरून घ्यावं लागलं.

लेफ्टनंट नाझिर अहमदपण स्टेशनवर हजर होता. ट्रेननं रंगून सोडलं, की नेताजींच्या हेडक्वार्टर्सवर जाऊन त्याला रिपोर्ट करायचा होता. नेताजींचं हेडक्वार्टर्स म्हंजे मिंग्लाडोनची लष्करी छावणी.

वारंवार जे अनुभव आले होते, त्याच्यावरनं नेताजींना जपानी लोकांचा तितकासा भरोसा वाटत नव्हता बहुतेक. कदाचित् त्यांना शंका असेल, की हे लोक फक्त आपल्यालाच हलवतील रंगूनहून. मुलींच्या तुकडीची पर्वाच करायचं नाही किंकान.

इथनंच त्रासाला सुरुवात झाली.

सात वाजले, आठ वाजले, नऊ वाजले—पण इंजिनचा काही पत्ताच नाही. स्टेशनमास्तर बिचारा काय सांगणार ? स्टेशनवरनं मिंग्लाडोनच्या लष्करी छावणीत फोन लावायचा प्रयत्न केला नाझिर अहमदनं. पण फोन लागेचना.

बरोब्बर नऊ वाजता नेताजी निघणार होते. बरोबर काही मंडळी. त्यात मेजर-

जनरल चतर्जीपण होते. म्हंज नाझिरलापण जायचं होतं. ह्यांचा मोटारींचा तांडा हलायची वेळ व्हायच्या आत त्याला तिथं हजर व्हायचं होतं. पण त्याला हुकूम मात्र असा होता, की आगगाडी सुटलेली स्वतःच्या डोळ्यांनी बघून मगच त्यानं परतायचं. म्हंजे आली का पंचाईत !

नाझिर विचारा पेचात सापडला. लेफ्टनंट थीबर्सचं न् त्याचं काहीतरी बोलणं झालं न् मग नाइलाजानं तो जिप घेऊन निघून गेला बातमी द्यायला. मिंग्ला-डोनला. म्हंजे चौदा मैलांवर.

पुढं काय झालं ते नाझिरच्याच तोंडून ऐकलं मी. आमचं असं-असं झालं हे कळल्याबरोबर नेताजींचा राग अनावर झाला. त्यांना चिडलेलं कुणी बघितलं नव्हतं फारसं. कोणत्याही परिस्थितीत ते शांत, थंड असायचे. कोणतीही बातमी कितीही वाईट असली तरी त्यांच्या चित्ताची चलबिचल व्हायची नाही. कोणत्याही दुःखात ते गीतेत म्हटल्याप्रमाणे 'अनुद्विग्नमना' असायचे. वैताग दाखवणं तर त्यांच्या स्वभावातच नव्हतं. पण ह्या बातमीनं मात्र ते ज्वालामुखीसारखे भडकून उठले. आझाद हिंद सरकारचे प्रचार-सचिव होते अय्यर. त्यांना नेताजींनी ताबड-तोब बोलवून घेतलं. सांगितलं—तुम्ही आत्ताच्या आत्ता हाचाइयांना भेटा. वाटल्यास इसाडेंशीपण बोला. म्हणावं, राणीवाहिनीला हलवलं नाही तर मी काही रंगून सोडून जाणार नाही ! म्हंजे काय ते तुमचं तुम्ही समजून घ्या म्हणावं ! अन् म्हणावं ह्याच्यामुळं जे काही होईल त्याचा जाब तुम्हाला जनरल तोजोंना द्यावा लागेल हे लक्षात ठेवा !

सॅल्यूट ठोकून अय्यरसाहेब लगेचच निघत होते. इतक्यात नेताजींनी परत बोलावलं—अन् हे बघा !

अय्यर परत फिरले. त्यांनी पाह्यलं, नेताजी उठून उभे राह्यले होते. स्थिर नजरेनं अंधाऱ्या रात्रीचं ब्लॅक-औटमधलं आकाश ते पहात होते. काही सेकंद त्यांना बोलताही आलं नाही. मग त्यांचे ओठ हलले. पण हा आवाज-सरसेनापती नेताजींचा गंभीर आवाज नव्हता. नेताजी तोंडातल्या तोंडात म्हणाले—आणखी एक सांगा. म्हणावं, हा सुभाषचंद्र बोस इतःपर जपान सरकारकडनं आणखी कसलीच मदत कधी मागणार नाही ! हीच शेवटची भिक्षा आहे !

राग नाही, वैताग नाही, सरळ विनवणीचा सूर होता त्यांच्या आवाजात.

मान खाली घालून अय्यर परत निघून गेले.

हे दृश्य काही मी स्वतःच्या डोळ्यांनी पाहिलेलं नाही. नाझिरकडनं कळलं नंतर.

नेताजींना कधीच कुणाचकडनं काही मागता यायचं नाही. फक्त ह्या तीनशे भारतीय स्त्रियांच्या इज्जतीखातर राजाला आज फकीर व्हावं लागलं ! हिटलर-कडनं त्यांनी पैशाची मदत घेतली होती. दान नाही, कर्ज ! अन् त्याची काही परतफेडपण केली होती ! जपानकडनं युद्धाची सामग्री घेतली होती. तीपण दान

म्हणून नाही, कर्ज म्हणून ! अन् आझाद हिंद सेनेच्या सैनिकांनी त्याची परतफेड पण करून टाकली होती—काळजाचं रक्त वेचून ! पैसे घेतले होते पूर्व-आशिया-तल्या अगणित माणसांच्याकडनं. तेदेखील दान नव्हतं. मान ताठ ठेवून नेताजींनी मागणी केली होती ! स्वातंत्र्याची किंमत होती ती !

पण आज ह्या सरसेनापतींनी पहिली न् शेवटची भिक्षा मागितली—आमच्या-खातर. निव्वळ आमच्याखातर.

मी आधीच सांगून टाकलंय् की त्यांना अगदी जवळनं बघायची दुर्लभ संधी मला मिळाली होती. नानाप्रकारचे भाव त्यांच्या चेहऱ्यावर उमटताना बघायला मिळाले मला. मी त्यांना दमले-भागलेले बघितलेयत्. खिन्न, विषण्ण झालेले बघित-लेय्त. काळजीनं गांजलेले बघितलेय्त. न कंटाळता कष्ट झेलताना बघितलेय्त. स्वत:ला ओवळून टाकायच्या आवेगानं ज्वालामुखीसारखं थरथर कांपताना बघित-लेय्त. मृत्यूवर विजय मिळवणारं त्यांचं निर्भय रूप मी बघितलंय्. जगण्या-मरण्या विषयीची त्यांची वेहद्द बेफिकिरी बघितलीय्. लाखो माणसांच्या मनात उत्साहाचं वादळ उठवून देणारा त्यांचा जादूचा मंत्र मी ऐकलाय्. एवढंच काय पण ह्या कातळासारख्या टणक माणसाचे दोन्ही डोळे आसवांनी भरून येतानापण मी पाह्यलेत. त्यांना धीर सोडताना मात्र मी स्वत: कधीच बघितलं नाही. तो प्रसंग नाझिरच्या तोंडून ऐकायला मिळाला मला. एका अत्यंत दुर्मिळ क्षणी त्यांना शरमिंदे झालेले पण बघितलेत मी. पण ती गोष्ट ओघानं येईल इथ नको.

पण एक भाव मात्र मीच काय पण आमच्यापैकी कुणीच कधी बघितला नाही नेताजींच्या चेहऱ्यावर उमटलेला ! अन् तसं तर ती भावना आपल्या सगळ्यांच्यांत असतेच की. कारण काही झालं तरी आपण सगळे मर्त्यच ना ! पण तो भीतीचा भाव नेताजींच्या चेहऱ्यावर बघायला मिळाला नाही कुणाला कधीच !




पण हे भलतीचकडे वहावत गेले की मी ! तर काय म्हणत होते –

हा ! बातमी आली की आमच्या गाडीला घेऊन जाणारं इंजिन म्हणे संध्याकाळच्या अंगाला झालेल्या शत्रूच्या विमानहल्ल्यांत जखमी होऊन गेलं होतं. त्यामुळं आमची गाडी वेळेवर सुटू शकली नाही,

जनरल इसाडोंनी नेताजींना कळवलं, आय ॲम सॉरी ! अन् पुढं असं की आता काही आगगाडीनं ह्या स्त्रियांना हलवणं जमण्याजोगं नाही. तर त्याऐवजी आमच्याकरता काही ट्रक्स पाठवून देतो असं त्यांचं म्हणणं

स्टेशनवरनं आम्ही सगळयाजणी आपल्या बराकीत परत आलो. तेव्हा रात्रीचे अकरा वाजले होते.

मग लांबलचक वाट बघणं सुरू झालं. बारा वाजले. एक वाजला. गाडयांचा काही पत्ता नाही.

नेताजींना न् त्यांच्याजवळच्या प्रमुख मंडळींना घेऊन जायला ज्या गाडया येणार होत्या, त्या सगळया वेळेवरच आल्या होत्या. संध्याकाळपास्नच त्या तयारीत होत्या. पण आमचे ट्रक्स आले नाहीत तर नेताजी काही इथनं निघत नाहीत. हे एव्हाना सगळयांनांच पक्के कळून चुकलं होतं. त्यामुळं त्यांना तशी विनंती करायचे धाडस कुणाच्यानं करवलं नाही.

नेताजी बिल्कुल तयारीनं हेडक्वार्टर्समध्ये एक वेताच्या खुर्चीत बसून होते. ब्रीचेस, टॉपबूट न् टोपी. गाडया आल्या की लगेच निघायचं.

जराशा अंतरावर इतर लष्करी अधिकारी. भोसले, कियानी, अय्यर, चतर्जी, स्वामी. नेताजींचे पर्सनल डॉक्टर मेजर मेनन. एडिकाँग रावत. कॉन्फिडेन्शिअल स्टेनो भास्करन. खास गडी सुनील. न् टेबलबॉय काली. शिवाय आणखी चिकारच माणसं.

तासामागनं तास जात होते. रात्रीचे दोन, अडीच, तीन, साडेतीन, चार, कुणाच्याच तोंडी काही शब्द नाही.

शेवटी साडेचारच्या सुमाराला कुणीतरी धावत-पळत आला. म्हणाला ट्रक्स आलेयत.

चार गाडया तर आधीपास्नंच उभ्या होत्या. आता त्यात बारा बोडक्या ट्रक्सची भर पडली.

कर्नल स्वामींनी संकोचलेल्या स्वरात बातमी नेताजींना सांगितली.

नेताजींनी एक निःश्वास टाकला. डाव्या हातावरच्या घडयाळाकडे एक नजर टाकली. अन् ते मंद हसले. म्हणाले–धन्यवाद ! आता झोपायला हरकत नाही !

अन् धीमी पावलं टाकत ते झोपायला गेले.

[ क्रमशः ]

पृष्ठ ८ वरून

नाही. नाहीतर त्यांच्यामुळे आम्ही कचरा वा दुर्गंधीपासून सुरक्षित राहू शकतो याची जनतेला जाणीव होणार नाही.

वेस्टच्या बसेसही रस्त्यावरून पळू लागल्या होत्या. नियमाप्रमाणे काम म्हणून संपाच्या सुरुवातीला एका ठराविक वेगाने जाणाऱ्या गाड्या भर वेगात पळत होत्या. एकूण १२४० गाड्या रस्त्यावर होत्या. रस्त्यावर त्यांनी एका मागोमाग एक अशी रांग लावली होती. संपकाळात जरा अपघात कमी झाले. तेव्हा याचे क्रेडिट बस ड्रायव्हर्सना द्यायला हरकत नसावी.

बसेस नसताना शिवसेनेच्या भगव्या झेंड्याप्रमाणेच इंदिरा काँग्रेसनेही आपली गेलेली पत मिळविण्याचा उपद्व्याप केला. त्यांनी ट्रक्स रस्त्यावर आणले. पण ते काय पुरे पडणार ? त्यावर त्यांनीही काँग्रेसचे चरखेवाले ध्वज फडफडवले. असे झाले तरी म्हणतात ना 'बुंदसे गई तो हौदसे नहीं आती' त्यांच्या नगरपित्यांनी महापालिकेत बोनस ठरावाला पाठींबा देताना जी खास दिलचस्पी दाखवली आणि मग त्याच ठरावाला विरोध केला त्यामुळे लॉऱ्या फिरवून गेलेली पत येऊ शकली नाही. लोक अडलेले होते मग करता काय ? अडला नारायण गाढवाचे पाय धरी या न्यायाने लोकांनी ट्रक्सचा फायदा उपटला.

कालपासून घरातील पेशन्टस हॉस्पिटलमध्ये गर्दी करू लागले. त्यांनाही हायसे वाटले. तसे साऱ्याच मुंबईकरांचे धाबे दणाणले होते. अहो करायचे काय अचानक दुखणे उद्भवले तर ? पण अनेकांना वाटले असेल हॉस्पिटलमध्ये हलगर्जीपणामुळे मरण्याऐवजी घरीच मेलेले काय वाईट. तेव्हा गेल्या १३ दिवसातील हे पातक जरा कमी झाले हेही नसे थोडके.

संप मिटला. आता मागण्यांचे काय ? नमलं कोण ? सरकार की कामगार ? शासनाने डरकाळी फोडली होती की विनाअट संप मागे घेतल्याशिवाय बोलणी नाहीत. पण हे सारे बाजूला ठेवून त्यांनी बोलणी केली. संप नेत्यांनी मागण्या मान्य झाल्याशिवाय संप मागे नाही ही घोषणा अनेकवार केली पण तसेही झाले नाही. म्हणजे दोघेही मागे आले. याला डावपेचात्मक भाषेत 'सन्मान्य तडजोड' 'यशस्वी सांगता' वगैरे वगैरे म्हणतात. यात संपावरील कर्मचाऱ्यांचे मात्र हाल विचारू नका असे असतात.

मुंबई महापालिका संपावरील कर्मचाऱ्यांचा तेरा दिवसांचा पगार कापणार आहे असे म्हणतात. पण तो तेरा महिन्याच्या अवधीत कापला जाणार आहे. आहे. म्हणजे प्रत्येक महिन्याला एका दिवसाचा पगार कापला जाणार आहे. सध्या तरी त्यांच्या हाती काही पडलेले नाही. मात्र एक गोष्ट सत्य आहे. पांढरपेशा

कारकून वा शिक्षक तेरा दिवस निर्धाराने संप करतो हेच काहीतरी अफलातूनपैकी महत्त्वाचे आहे.

शेवटी पोट हे प्रत्येकालाच आहे. क्या करेंगे ? संप रेंगाळू लागला की घाम फुटायला लागतो. पण त्यांनी तग धरला. हा संप फुटता किंवा 'सन्मान्य तडजोडी'-अभावी अयशस्वी ठरता तर कामगार चळवळीला बसलेला तो एक जबरदस्त तडाखा ठरला असता. मुंबईतील कामगार चळवळ जवळ जवळ मृतवत झाली असती. देशातील कामगार चळवळीवर त्याचा परिणाम झाला असता. हे घडले नाही हे फार चांगले झाले. जॉर्ज फर्नांडिस यांच्या नेतृत्वाखाली नाराजीने काही पक्ष आले. युनियन्स आल्या, त्यात त्यांचाही काही हेतू होता. फायदा बघितला गेला होता. पण याचा सर्वांत अधिक फायदा समाजवादी पक्षाला मिळणार आहे. प्रजासमाजवादी व संयुक्त समाजवादी युतीचा शाप समाजवादी पक्षाला भोवला होता. आता त्यांची एकजूट चांगली झाली आहे. पक्षात व त्या पक्षाच्या युनियन्स-मध्ये आलेली मरगळ गेली आहे. जॉर्जने पुन्हा मुंबईत भक्कमपणे पाय रोवले असल्याचेही सिद्ध झाले आहे. काँग्रेसविरोधात सर्व पक्ष एकत्र येतात याचाही प्रत्यय आला आहे. श्री. एस. एम. जोशी यांच्या वडिलकीच्या मध्यस्थीमुळे संप मिटला. तेव्हा श्रेयात त्यांचा वाटा अधिक आहे. मुख्यमंत्र्यांचीही प्रतिमा उजळली आहे. विशेषत: बी. पी. सी. सी. ने त्यांना बदनाम करण्याची एकही संधी घालवली नाही पण त्यांनी बी. पी. सी. सी. कडे न पहाता पक्षाचे हित पाहिले व बी. पी. सी. सी. ला विचित्र परिस्थितीतून बाहेर काढले. पूर्वाश्रमीचे कॉम्रेडस रजनीभाई पटेल, गोदीवाला आणि मेंगदे कंपनी व त्यांची बी. पी. सी. सी. फारच बदनाम झाली. आता ही मंडळी मागे पडत आहेत. त्यांचे वकिली मेंदू राजकारणाला पराभूत ठरत आहेत. इंदिराबाईंनाही रजनी पटेल कळून चुकले असतील. हे साहेब घानाला पळाले. अथाईडबाईंनी काही महिन्यांपूर्वी त्यांची (पटेलांची) उचलबांगडी करण्यासाठी जे उपोषण केले त्या वेळीही ते मुंबईबाहेरच दडी मारून बसले होते.

लोके-धारिया हे फरफटत गेले होते. त्यांची, तसेच मनोहर कोतवाल आणि तुषार पवार यांची अवस्थाही भयानक झाली आहे. तेही या संपात बदनाम झाले आहेत. नवकाँग्रेस म्हणजेच जनतेचे कल्याण करण्याचा वसा घेतलेला पक्ष ही त्यांची घमेंड अंगाशी आली आहे.

संपाला जे हिंसक वळण लागू पहात होते ते संप मिटल्याने आता नाहीसे झाले आहे. संपावर असलेला कामगार वर्ग कोंडी फुटत नसेल तर हाताबाहेर जातो हा मागील इतिहास आहे. येथे तसेच झाले. पोलिसही तसे शांतच होते. पण मग एकदम बांध फुटला. संप फोडणाऱ्यांना जबाब देण्याच्या नावाखाली थोडेफार हिंसक प्रकार घडले. पोलिसांनीही मग आपली शक्ती वापरली. त्यात त्यांनी संपावरील लोक व नागरिक असा भेदभाव केला नाही. एकाला पांगळा होईपर्यंत

त्याच्या पायावर लाठीचे प्रहार केले. फळे विकणारे व केळी विकणाऱ्या व्ही. टी. स्टेशनाबाहेरील निरपराध बाया त्यांची त्यांनी डोकी फोडली. एस्. आर. पी. तर हृदयशून्यच म्हणा. पोलिसीवापर अधिकाऱ्यांच्या हुकूमाने झाला नव्हता हे सत्य आहे. (लाठीमाराला पोलीस व शासन नेहमीच सौम्य छडीमार म्हणत असते.). परवा बोरीबंदरला खरे म्हणजे -अगदी परिस्थिती हाताबाहेर गेली तर प्रथम सिग्नल म्हणून अश्रूधुराच्या फैरी झाडायच्या व मगच लाठीमार म्हणजे छडीमार करायचा असे ठरले होते पण त्याआधीच लाठीहल्ला सुरू झाला होता. आम्ही वार्ताहर कसेबसेच बचावलो. आमच्या एका फोटोग्राफर मित्राने कॅमेरा दाखविला नसता तर त्याच्या बरगड्या मोडल्या असत्या. हे सारं घडून गेल्यावर मग वराती मागून घोडे असे वरिष्ठ पोलीस अधिकारी आले आणि हुकूम नसता हे कसे घडले? कोणत्या युनिटने (पोलिसांच्या) ही चुकी केली याची चर्चा करीत बसले. पोलिसांचा हल्ल्याचा आवेश फोटोतही स्पष्ट दिसत होता.

आता शेवटचे दोन मुद्दे इथे देतो.

संपाबाबत सरकारी व संपनेत्यांचे डावपेच काय होते? सरकारच्या डावपेचाचे दोन महत्त्वाचे भाग. एक म्हणजे संपनेत्यांना पकडायचे नाही आणि वाटाघाटींना बोलवायचे नाही. यामुळेच कोंडी निर्माण झाली. हे डावपेच चांगलेच यशस्वी झाले, तर संपनेत्यांनी पायरी-पायरीने संपाची झळ पोहचेल अशी नीती अवलंबली होती.

प्रथम ' इंजिनियरिंग खात्याचा संप, पण त्या वेळी बस कन्डक्टर वा ड्रायव्हर्स कामावर. पण मेकॅनिक्सच नाहीत तर आजारी बसेसची निगा कोण राखणार? चांगल्या बसेस चांगल्या स्थितीत कोण ठेवणार. जॉर्जने खूप म्हटले तुम्ही आमच्या अटी मान्य केल्यात तर अर्ध्या तासात मी ६०० बसेस रस्त्यावर आणतो पण इंजिनियरिंग खात्या अभावी त्या बसेस हळूहळू पुन्हा डेपोतच राहिल्या असत्या. म्हणजे हळूहळू ड्रायव्हर्स व कंडक्टर्स हरीहरीच करीत बसले असते. त्यानंतर लाक्षणिक म्हणून ३० तासाच्या टॅक्सीजचा संप. त्यांचा बेमुदत व ३० तासांचा हॉटेल कामगारांचा संप आणि हॉस्पिटल कामगारांचा संप हे पुढील मुद्दे होते. मुंबई व महाराष्ट्र बंद हे शेवटचे तीर होते पण ते त्यांनी राखून ठेवले होते.

शेवटचा मुद्दा दिखावूपणा करणाऱ्यांबद्दलचा. फोटोसाठी अनेकांनी झाडू हाती घेतले. त्रिवेदीमहाशयांचा मुख्यमंत्र्याबरोबर रस्ता झाडत असतानाचा सोमवारच्या टाईम्समधील फोटो पहा. मुख्यमंत्री निदान रस्ता झाडत असल्याचे तरी दिसते; त्रिवेदीसाहेब अगदी वाकलेलेही नाहीत. मग झाडायचे सोडाच, आणि म्हणे हे गांधीजींचे सच्चे चेले.

□ □ □

# पडदा

## रायन्स डॉटर : समुद्राने पाहिलेली

**देवीदास बागूल**

फार वर्षापूर्वीची गोष्ट आहे. एक शिष्या आपल्या गुरूशी लग्न करते...पुढे काय झाले ? पुढे काय झाले ते कळलेच नाही. कळले ते एवढेच की विद्यार्थिनीने आपल्या गुरूशी, गुरुजीशी, मास्तरांबरोबर, शिक्षकाशी, प्राध्यापकाबरोबर लग्न केले. अशा अनेक गोष्टी. इकडच्या तिकडच्या. प्राचीन, अर्वाचीन. पाश्चात्य खंडातल्या, पौर्वात्य देशातल्या.. रूपे अनेक, अर्थ एक.

गेल्या शतकात अशीच एक गोष्ट घडली...पाश्चात्य खंडातल्या आयर्लंड देशात. ब्रिटिशांची सत्ता आणि आयरिश क्रांतिकारकांची हालचाल...अशा वातावरणात समुद्रकिनाऱ्यावरच्या एका खेड्यातली शिक्षण संपवलेली एक विद्यार्थिनी आपल्या मास्तरांबरोबर लग्न करण्याचा निर्णय घेते. कसा घेते ? केव्हा घेते ? कुठे घेते ? हा उदात्त निर्णय पाह्यचा असेल तर थोड्या उंचीवरूनच पाहू या...समुद्रकिनारा कसा रम्य दिसतो ! आणि त्यावरचे ते दोन ठिपके परस्परांकडे सरकताहेत. दुरून साजरे दिसणारे हे दृश्य जवळूनही तितकेच गोजरे दिसते. ती कशी उत्सुक, उत्फुल्ल आणि उत्कट दिसते आहे ! आणि तो ? प्रौढ, शांत, धौम्य आणि आश्वासक. ती गाणारी, तो तंबोऱ्याप्रमाणे हुंकार देणारा.. काय बोलली ती दोघे ? पण कशाला हव्यात त्या गोष्टी ? त्या गोष्टी ऐकण्याच्या ऐवजी ती काय करते तेच पहा ना ! त्या मखमली वाळूत उमटलेल्या त्याच्या थोराड पावलाच्या ठश्यात आपला नाजुकसाजूक पाय अनावृत्त करून ठेवते आहे. ह्याची पावले आजवर अध्ययनाच्या माध्यमातून अनुसरली आता विवाहाच्या माध्यमातून अनुसरली तर ? पण एवढ्यात ती खट्याळ लाट आली पहा. पावलांचा गोफ विणायचे तसेच राह्यले ना !

मग ती सरळ त्याच्या घरीच जाऊन म्हणते की मला तू आवडतोस ! आता बोला. म्हणजे ऐका. नव्हे, पहा...तो समजून घेण्याचा आणि समजावून देण्याचा

प्रयत्न करतोसे दिसते. म्हणजे त्याचे काय आहे...छे छे ! अशा वेळी शब्दांनी का काम होते ? तिचा खांदा तो आपल्या हाताने दाबतो आणि दुसऱ्या क्षणी तो तिच्या अधरांना आपल्या अधरांनी टिपून घेतो.

ज्या लग्नाची सुरुवात अशी अधीर–गंभीर आहे त्याचा शेवट कसा होणार ? छे, काही सांगता येत नाही...एक मात्र सांगता येईल की ही गोष्ट वेगळी आहे. म्हणजे वरवरचे मास्तर-विद्यार्थिनीचे रूप फार फार वर्षांपूर्वीचे आहे. पण मीलनाचा अर्थ वेगळा आहे. निदान त्याच्या बाजूने तरी अर्थ निराळा आहे.. जो सगळे जीवन, त्याच्यातल्या संगीतासह समजून जगतो आणि समजावून जगवतो, तो त्या जीवनातल्या वादळांना पचवल्याशिवाय राहील की काय ? आणि वादळाशिवाय जीवन उभे राहिलच कसे ?

आणि एके दिवशी खरेच वादळ उभे राहिले . वर्गातल्या मुलामुलींना घेऊन तो समुद्रकिनाऱ्यावर जातो. थोडा वेळ मुलांशी बोलण्यात जातो. मग तो मुलांना पाण्यात पिटाळतो आणि सहज इकडेतिकडे बघतो. ते काय दिसते आहे ? आणि साथीची पावले कुणाची ? त्या पावलातले एक पाऊल सरपटताना दिसते आहे. म्हणजे हा तो गावात आलेला नवागत ब्रिटिश तरुण लंगडा मेजर तर नव्हे ? म्हणजे ही त्याच्याबरोबर फिरायला गेली की काय ? तो कावराबावरा होतो आणि त्या पावलांचा मागोवा घेत एका डबक्याजवळ येतो. येथे ती दोघे थांबलेली दिसतात. कशाला थांबली असतील बरे ? म्हणजे असे झाले असेल काय...ती पहा ती दोघे जणू काही येतच आहेत...हातात हात गुंफून.. तो खाली वाकतो आणि आपल्या गुडघ्यावर तिचा पाय घेऊन तिच्या पायातून बूट काढतो...तिला अनवाणी चालायला आवडते ना, म्हणून...मग तो तिला त्या पाण्याच्या डबक्याजवळ


# पांढऱ्या डागांवर मोफत इलाज

पांढऱ्या डागांवरील औषधाचा महत्त्वपूर्ण शोध. अनेक वर्षांच्या कठोर प्रयत्नानंतर आम्ही अनेक आडाखे बांधून पांढऱ्या डागांवरील औषधे तयार करण्यात यशस्वी झालो आहोत. एकदा औषध घेतल्यावर आपणांस त्याच्या गुणांची खात्री पटेल. ह्यापासून हजारो लोकांनी लाभ घेतलेला आहे. आजही बरेचजण याचा लाभ घेत आहेत. प्रचारार्थ औषधाची एक बाटली नमुना म्हणून दिली जाते. पांढऱ्या डागांपासून मुक्त झाल्यावर आपल्यासारख्याच या रोगाने पछाडलेल्या रोग्यांना औषध घेऊन रोगापासून मुक्त होण्यासाठी अवश्य सांगा.

**प्रेम ट्रेडिंग कंपनी** (S. N.) पो. कतरी सराय (गया)

आणतो...ती त्याला एक इच्छा पुरवायला सांगते...तो त्या डबक्याच्या कडेला असलेला शंख काढून, धुवून, स्वच्छ करून तिला नजर करतो...आणि पुन्हा ती रमतगमत जाऊ लागतात...तो भानावर येतो आणि आता वेडावल्यागत त्यांच्या पावलांचा माग घेत पळत सुटतो आणि एका गुहेपाशी येऊन थांबतो.

आपले गुरुजी का पळतात हे लक्षात न आल्याने मुलेमुली त्याच्या मागोमाग धावत धावत येतात आणि त्याला घेरून टाकतात...

काय झाले हे ? ज्या समुद्रकिनारी पहिले मीलन झाले त्याच समुद्रकिनारी हे दुसरे मीलन पहावे लागले काय ? तिला विचारावे काय ? का विचारण्याच्या अगोदर पुरावा पहावा ; तो शंख तिने घरी आणला असेल काय ? कुठे असेल तो शंख ? तो इकडे तिकडे चाचपून पहातो. तिच्या कपड्यांच्या कपाटात झग्याखाली लपवून ठेवलेला त्याला दिसतो...क्षणभर बघून तो शंख तिथल्या तिथेच ठेवतो.

तुम्ही म्हणाल की संपले सगळे ! आता फक्त स्फोट दाखवा. पण छे. ही गोष्टच वेगळी आहे असे त्या गोष्टीच्या सुरुवातीच्या वेळीच दिसले नाही का ? ज्याने स्वीकार समजून-उमजून केला तो वादळेसुद्धा समजून-उमजून घेणार हे वेगळे कशाला सांगावे लागावे ? फक्त कोणकोणती वादळे आहेत हे डोळे उघडे ठेवून बघू या, एवढीच त्याची भूमिका आहे.

आणि एकदा तर समुद्रकाठी भर वादळात क्रांतिकारकांनी गावकऱ्यांच्या मदतीने वेचलेला दारूगोळा तो लंगडा मेजर अडवतो, आणि त्या वेळी तो मेजर जेव्हा कशानेसा भोवळ येऊन पडतो तेव्हा जनलज्जेची पर्वा न करता ती त्या मेजरला सावरायला पुढे धावते. त्या धावण्यात केवळ शारीरिक आकर्षण होते की मनाचे उत्कट रंग होते ? आणि त्या अतिप्रसंगातून तिला सावरण्यासाठी तो पती म्हणून पुढे होतो तेव्हा त्याच्या मनात काय काय आले असेल ?

फार कशाला त्याच, चांदण्यारात्री नवऱ्याला अंथरुणात तसेच सोडून ती जेव्हा प्रियकराकडे धाव घेते तेव्हा ते दृश्य चोरून पाहताना त्याचे काय झाले असेल ? तो होता तसा उठला आणि समुद्रकाठी खडकावर जाऊन बसला. समुद्रकाठी तो तसा बसलेला, तर वाळूत तो प्रियकर सैनिकांकरवी रात्रीच्या सामानसुमानाचे अवशेष गोळा करीत उभा. काय करावे ? किंवा न करावे ?

गावातला फादर कपडे आणून देतो तेव्हा तो ते कपडे घालून घरी येतो आणि बायकोबरोबर पुढच्या गोष्टी बोलतो. काय करायचे पुढे ? पण त्यांनी काही करायच्या आत गावकरी झुंडीने त्यांच्या घरावर चालून येतात आणि तिला बाहेर खेचून तिची सर्व प्रकारची मानखंडना करतात.

तो तिला आत नेतो आणि शेकोटीजवळ बसवून कॉफी वगैरे देतो. आता तर तिला अधिकच जपले पाहिजे. आजारी माणसाचा आजार नष्ट करायचा असतो, आजारी माणूस नव्हे. शिवाय त्या प्रियकरानेही आत्महत्या केल्याचे कळते. एखादे

फूल ओंजळीत धरून आणावे तसे तो तिला घेऊन गाव सोडतो.

गाव सोडताना सगळ्यांनी दारेखिडक्या लावून घेतलेल्या असतात. पण एक विद्यार्थीनी मात्र एका अलौकिक फार फार वर्षांपूर्वीच्या धैर्याने बाहेर येते आणि आपल्या 'सरां'ना पुष्प गुच्छ सादर करते.

म्हणजे तो गावातून जाता जाता नवी पण जुनीच गोष्ट गावात येत असते.

फार फार वर्षांपूर्वीची गोष्ट एका विद्यार्थिनीने आपल्या गुरुजींशी लग्न केले. पुढे त्याचे काय झाले कुणास ठाऊक ? पण शंभर वर्षांपूर्वी एका शिक्षकाने एका विद्यार्थिनीशी लग्न केले. त्याचे काय झाले ? त्याचे जीवन समर्थ आणि सुंदर झाले. प्रकाशित आणि प्रकाशदायी झाले. दुसऱ्या विद्यार्थिनीने तो वसा घेतला आणि त्याच्या महायात्रेवर पुष्पगुच्छ ठेवला.

खरे म्हणजे ही गोष्ट सांगायचीच नव्हती. कारण काही गोष्टी फक्त पाहण्याच्या असतात. त्यांचे दर्शन घ्यायचे असते. असे दर्शन स्वतःच फार बोलके असते.

हे दर्शन बोलके होत असताना त्याला छबी, उत्कट, विव्हल, स्फोटक, निरागस भावमुद्रा लाभाव्यात म्हणून दिग्दर्शकाने वेळोवेळी निसर्ग, गाव, गावातले लोक, ब्रिटिश मेजर, फादर आणि खुळा यांच्या क्रियाप्रतिक्रियांचा कधी चौकट म्हणून, कधी पार्श्वभूमी म्हणून तर कधी क्रियाशील घटक म्हणून जो चतुर वापर केला आहे तो फार नाटयमय परिणाम करतो. वाटते की, यातला कुठलाच घटक वरकड म्हणून बाजूला काढता येणार नाही. एक झाले म्हणून दुसरे घडले. तसे घडले म्हणून असे झाले. यातली वादळे आंधळी होती, पण अपरिहार्य होती असेच शेवटी वाटते. कारण त्या वादळांनीच रायन्स डॉटरला जीवनदर्शन घडवले !

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही.
ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.

**राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर**

MANOOS (Weekly) : 50 Paise : Regd. No. MH 649

# बर्वे-पायगुडे निधी

अनिल बर्वे व काशिनाथ पायगुडे हे दोघेजण नक्षलवादी पत्रके छापल्याच्या आरोपावरुन गेले वर्ष-सव्वा वर्ष (एक महिना वगळता) येरवड्याच्या तुरुंगात डांबले गेलेले आहेत, हे आता सर्वांना माहीतच आहे. त्यांच्यावरील खटल्याचे रीतसर कामकाज पुणे येथील न्यायालयात सध्या सुरु आहे. कागदपत्रे, वकील फी, प्रवास इत्यादी सर्व मिळून सुमारे दोन ते तीन हजार रुपये तरी याकामी खर्च येईल असा अंदाज आहे. आत्तापर्यंत चार-पाचशे रुपयांचा खर्च होऊनही गेलेला आहे. ज्या मित्रांना बर्वे-पायगुडे यांना न्याय मिळाला पाहिजे असे वाटते त्यांनी यावेळी पुढे येऊन खर्चाचा भार यथाशक्ती उचलणे अवश्य आहे. रक्कम लवकर मनिऑर्डरने पाठवावी किंवा खालील पत्त्यावर पोचती करावी. सर्व हिशोब शेवटी 'माणस 'मधून प्रसिद्ध होईल.

संपादक माणूस

बर्वे–पायगुडे समिति

माणूस साप्ताहिक । १०२५ सदाशिव पेठ । पुणे ३०.